cmyk

दैनिक राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

बीड – महाराष्ट्र | वर्ष–५ | अंक–५२ | रविवार, दि.१५ जुन २०२५ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये

## संपादकीय

### जागतिक बँकेकडून प्रशंसा

गेल्या ११ वर्षांमध्ये भारताने २७ कोटी नागरिकांची अतिदारिद्र्यातून मुक्तता केली आहे. तसेच याच कालावधीत भारतातील अतिदारिद्र्याचे एकंदर लोकसंख्येच्या तुलनेतील प्रमाणही २७.१ टक्क्यांवरुन ५.३ टक्क्यांपर्यंत घसरले आहे, असे जागतिक बँकेने आपल्या अहवालात स्पष्ट केले आहे. नुकताच हा अहवाल प्रसिद्ध करण्यात आला. जागतिक बँकेने विचारात घेतलेला कालावधी २०१२ ते २०२३ हा आहे. सध्याच्या केंद्र सरकारच्या विविध जनहित धोरणांमुळे दारिद्र्यानिर्मूलनात ही झेप घेणे भारताला शक्य झाले, अशी प्रशंसाही जागतिक बँकेने केली आहे.

### इस्रायल– इराणमध्ये संघर्ष वाढल्याने कच्चे तेल भडकले

नवी दिल्ली : इस्रायल-इराणमध्ये संघर्ष वाढला आहे. यामुळे मध्य पूर्वेतून तेल निर्यातीबाबत अनिश्चितता निर्माण झाली आहे. परिणामी कच्च्या तेलाचे दर भडकले आहेत. क्रूड फ्युचर्सचा दर ४.८७ डॉलरने म्हणजेच ७ टक्के वाढून प्रति बॅरल ७४.२३ डॉलरवर स्थिरावला. सुरुवातीला तो सुमारे १३ टक्के वाढून ७८.५० डॉलरवर गेला होता. यूएस वेस्ट टेक्सास इंटरमीडिएट क्रूडचा दर ४.९४ डॉलर अथवा ७.२६ टक्क्यांनी वाढून प्रति बॅरल ७२.९८ डॉलरवर बंद झाला. इस्रायलने म्हटले आहे की, त्यांनी इराणचे अण्वस्त्र तळ, बॅलिस्टिक क्षेपणास्त्र कारखाने आणि प्रमुख लष्करी कमांडरना लक्ष्य केले. त्यानंतर काही वेळातच, इराणने तेल अवीवमधील इमारतींवर क्षेपणास्त्र हल्ला केला.


# राज्यात मान्सूनची वेगाने आगेकूच!

## शेतकऱ्यांसाठी दिलासादायक स्थिती, पावसाचा जोर कायम राहणार

**पुणे । प्रतिनिधी**

**मान्सूनचा वेग पुन्हा वाढल्यामुळे २५ जूनपर्यंत दिल्लीसह वायव्य भारतातील बहुतांश भागांमध्ये मान्सून पोहोचण्याची शक्यता आहे. हवामान विभागानुसार १८ जूनपर्यंत मान्सून मध्य आणि पूर्व भारतातील उर्वरित भागांमध्ये तसेच वायव्य भारतातील काही भागांमध्ये पोहोचेल.**

दक्षिण-पश्चिम मान्सूनने महाराष्ट्रात दमदार प्रवेश केला असून कोकण, मध्य महाराष्ट्र, विदर्भ व मराठवाडा या चारही विभागांत पावसाने चांगली हजेरी लावली आहे. हवामान खात्याच्या माहितीनुसार, जूनच्या दुसऱ्या आठवड्यात मान्सूनने राज्यात वेगाने आगेकूच केली असून अनेक जिल्ह्यांमध्ये सरासरीपेक्षा जास्त पावसाची नोंद झाली आहे. शेतकऱ्यांसाठी ही दिलासादायक स्थिती मानली जात आहे. पुढील दोन दिवसांत महाराष्ट्रात पावसाचा जोर कायम राहण्याचा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे. कोकण, मध्य महाराष्ट्र आणि विदर्भात विजांच्या कडकडाटासह ◀◀ पान २ वर



### धरण साठ्यांमध्ये हळूहळू वाढ

राज्यातील प्रमुख धरणांमध्ये अद्याप मोठ्या प्रमाणात पाणीसाठा झाला नसला तरी सुरुवातीचा पाऊस समाधानकारक ठरत आहे. कोयना, उजनी, जायकवाडी, भातसा, मुळा, पानशेत या धरणांमध्ये पाणी साठ्यात वाढ होण्यास सुरुवात झाली आहे. जलसंपदा विभागाने सांगितले की, पावसाची ही सुरुवात अशीच नियमित राहिली तर पुढील काही आठवड्यांतच पाणीटंचाईच्या भीतीतून दिलासा मिळू शकतो.

### मराठवाड्याला दिलासा

मराठवाडा हा पावसाच्या दृष्टीने कायमच असमाधानी राहिलेला भाग मानला जातो, मात्र यंदा मान्सूनची वेळेत एन्ट्री झाली आहे. छत्रपती संभाजीनगर, बीड, परभणी, लातूर आणि नांदेडमध्ये हलक्या ते मध्यम स्वरुपाचा पाऊस सुरू असून शेतकऱ्यांना दिलासा मिळाला असून त्यांच्यामध्ये आशा निर्माण झाली आहे. काही भागांत शेतकरी खत-बियाण्यांची खरेदी करत असल्याचे दिसून येत आहे.

## थोडक्यात...

### ठाकरे सेनेच्या सर्व नेत्यांची आज बैठक

मुंबई–शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे गट) प्रमुख उद्धव ठाकरे यांनी दि. १५ जून रोजी दुपारी १२ वा. मुंबईतील शिवसेना भवनात सर्व खासदार, आमदार व सर्व वरिष्ठ नेत्यांची एक महत्त्वाची बैठक बोलावली आहे. आगामी बृहन्मुंबई महानगरपालिका (बीएमसी) निवडणुकीची रणनीती ठरवणे हा या बैठकीचा मुख्य अजेंडा आहे.

### दक्षिण अफ्रिका वर्ल्ड टेस्ट चॅम्पियन

नवी दिल्ली–वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिप फायनल २०२५ स्पर्धेत नवा इतिहास रचला गेला आहे. लॉर्ड्सवर दक्षिण आफ्रिकेने ऑस्ट्रेलियाचा ५ विकेट्सने पराभव करून वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिप २०२५ चे विजेतेपद पटकावले. दक्षिण आफ्रिका वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिप जेतेपद जिंकणारा तिसरा संघ बनला आहे.

### म्हणूनच आम्हाला सरकारमध्ये बसवले – पंकजा मुंडे

मुंबई–शेतकऱ्यांविषयी महिलांविषयी आणि गरिबांविषयी आमच्या मनामध्ये प्रेम आहे, म्हणूनच आम्हाला सरकारमध्ये बसवले आहे, असे मंत्री पंकजा मुंडे यांनी म्हटले आहे.

### सत्तेत जायला हवं, पवारांच्या आमदारांची आग्रही मागणी

मुंबई–शरद पवारांच्या राष्ट्रवादीतील आमदारांना सत्तेचे वेध लागले आहे. आमदार अस्वस्थ आहे. त्यामुळे ते सत्तेत जाण्यासाठी आग्रही मागणी करत आहेत. तर दुसरीकडे खासदार शरद पवार यांच्या पाठीशी आहेत. पवारांनी भाजपाशी युती नको, अशी भूमिका घेतली आहे.

### अजितदादांच्या कार्यक्रमात गोंधळ

पुणे–उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या पुणे येथील कार्यक्रमात गोंधळ उडाला होता. बच्चू कडू यांच्या उपोषणावरून आंदोलनकर्ते आक्रमक झालेले दिसले. अजितदादांनी त्यांना मुख्यमंत्री आणि कडू यांच्यातील संवादाची माहिती दिली.

### बीडमधील प्रकल्प ओव्हर फ्लो

बीड– जून महिन्यातच ११ प्रकल्प ओव्हर फ्लो झाले आहेत. मान्सून पूर्व झालेल्या पावसाने बीडकरांची तहान भागली आहे. मे महिन्यात जिल्ह्यात दमदार पाऊस झाला. या पावसामुळे वर्षभराची पाण्याची चिंता मिटण्याची शक्यता आहे.

### राज ठाकरेंनी स्थापन केली केंद्रीय गट अध्यक्ष समिती

मुंबई–मनसे अध्यक्ष राज ठाकरेंनी केंद्रीय गट अध्यक्ष समिती स्थापन केली आहे. या समितीमध्ये बाळा नांदगावकर, अविनाश अभ्यंकर, कर्णबाळा दुनबळे व इतर १८० लोक आहेत. मुंबई महानगरपालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर ही समिती कार्य करणार आणि पक्ष बांधणी करणार आहे,

### विमान दुर्घटनेतील मृतांचा आकडा वाढला

अहमदाबद –एअर इंडियाचे विमान कोसळून झालेल्या भीषण अपघातातील मृतांचा आकडा वाढला आहे. आतापर्यंत २७० जणांचा मृतदेह सापडले असून त्यामध्ये विमानातील प्रवासी तसेच मेडिकल कॉलेजमधील डॉक्टरांचाही समावेश आहे.

# बच्चू कडूंचे अन्नत्याग आंदोलन थांबले

## मंत्री उदय सामंत यांच्या उपस्थितीत पाणी घेत सोडले उपोषण

**अमरावती । प्रतिनिधी**

**शेतकगययांना कर्जमाफी आणि दिव्यांगांच्या मानधनात वाढ या प्रमुख दोन मागण्या घेऊन गेल्या ६ दिवसांपासून आमरण उपोषणाला बसलेल्या माजी मंत्री आणि प्रहार संघटनेचे अध्यक्ष बच्चू कडू यांनी अखेर आपले उपोषण शनिवारी मागे घेतले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार हे कर्जमाफीबद्दल कधीच बोलत नव्हते. पण, आपल्या आंदोलनाने, उपोषणाने त्यांना यावर बोलायला भाग पाडले, असे ते म्हणाले.**

अजित पवार शनिवारी पुण्यातील कार्यक्रमात याबाबत बोलले, ◀◀ पान २ वर



### २ ऑक्टोबरपर्यंतची सरकारला मुदत

बावनकुळेंनी कडूंची मुख्यमंत्र्यांशीही चर्चा घडवून आणली. यावेळी कडूंच्या पत्नी नयना कडू भावनिक झाल्याचे पहायला मिळाले. त्यानंतर, मंत्री उदय सामंत यांच्या भेटीनंतर आंदोलन स्थगित करण्यात आले असून बच्चू कडू यांच्याकडून सरकारला २ ऑक्टोबरपर्यंतची मुदत देण्यात आली आहे. सरकारने मागण्या मान्य न केल्यास २ ऑक्टोबरनंतर पुन्हा तीव्र आंदोलनाचा इशारा देण्यात आला आहे. दरम्यान, बच्चू कडू यांच्या आंदोलनाला समर्थन देण्यासाठी १५ जून रोजी राज्यभरात करण्यात येणारे रास्तारोको आंदोलन मागे घेण्यात आले आहे.

# संभाजीनगर जिल्ह्यात वीज कोसळून दोन सख्ख्या भावासह ४ शेतकऱ्यांचा मृत्यू

**सिल्लोड । प्रतिनिधी**

**मराठवाड्यात मान्सूनचा जोर वाढला असून, सिल्लोड तालुक्यात शनिवारी दुपारी वीज कोसळल्याने चार जणांचा मृत्यू झाला. यामध्ये दोन सख्या भावांचा समावेश आहे. पेरणीच्या कामासाठी शेतात गेलेल्या या भावांवर विजेचा आघात झाला, तर अन्य दोन घटनांमध्ये आणखी दोघांचा बळी गेला. या हृदयद्रावक घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.**

सिल्लोड तालुक्यातील सारोळा येथे रोहित काकडे (वय २०) आणि यश काकडे (वय १७) हे सख्खे भाऊ आईसोबत शेतात पेरणी करत होते. अचानक वातावरण बदलले आणि



जोरदार विजेचा कडकडाट सुरू झाला. यावेळी वीज थेट त्यांच्या अंगावर कोसळली, ज्यामुळे दोघांचा जागीच मृत्यू झाला. दुसऱ्या घटनेत मोढा बू. (ता. सिल्लोड) येथे रंजना बापुराव शिंदे (वय ५०) या महिलेचा शेतात काम करताना विजेच्या आघाताने मृत्यू झाला. तिसरी घटना पिंपळदरी (ता. सिल्लोड) येथे घडली, जिथे शिवाजी सतीश गव्हाणे (वय २८) यांचा मृत्यू झाला, तर त्यांचा भाऊ जीवन गव्हाणे (वय २०) गंभीर जखमी झाला. त्यांच्यावर तातडीने उपचार सुरू आहेत. या नैसर्गिक आपत्तीचा फटका केवळ मानवी जीवनालाच नाही, तर जनावरांनाही बसला. मांडणा येथील गट क्रमांक २९५ मध्ये वीज पडून ज्ञानेश्वर माणिकराव लोखंडे यांची तीन वासरे दगावली. तर अन्वी शिवारातील गट क्रमांक १३९ मध्ये नारायण सांडू बांबर्डे यांची एक म्हैस देखील वीज पडून मृत्युमुखी पडली. मराठवाड्यात पावसाचा जोर वाढला असून, छत्रपती संभाजीनगरात शनिवारी दमट वातावरणासह अनेक ठिकाणी जोरदार सरी कोसळल्या. नांदेड आणि हिंगोलीत पावसामुळे केळी उत्पादकांचे मोठे नुकसान झाले. ◀◀ पान २ वर

# चाकरवाडी येथील शिवपुराण कथा समारोपास धनंजय मुंडे यांची उपस्थिती



**चाकरवाडी । प्रतिनिधी**

**संत वै. ह. भ. प. ज्ञानेश्वर माऊली यांच्या रौप्य महोत्सवी पुण्यतिथी निमित्त आयोजित अखंड हरिनाम सप्ताह तसेच श्री. प्रदीप मिश्रा यांच्या वाणीतून सुरू असलेल्या शिव महापुराण कथेचा आज समारोप होत असून, याप्रसंगी माजी मंत्री आ. धनंजय मुंडे हे चाकर वाडी येथे उपस्थित राहिले.**

यावेळी त्यांनी श्री प्रदीप मिश्रा तसेच महादेव महाराज चाकरवाडीकर यांचे दर्शन घेऊन आशीर्वाद घेतले. या सोहळ्याच्या अंतिम दिवशी आज महापंगतीला महाप्रसाद देण्याचा मान परळी करांना आयोजकांच्या वतीने देण्यात ◀◀ पान २ वर

# मुंडे साहेबांमुळेच प्रगती झाली; समृद्धी महामार्गावर हळवा क्षण!


## पंकजाताई मुंडेंना आला भावनिक अनुभव!

**परळी वै.। प्रतिनिधी**

**वंचित आणि उपेक्षित घटकांसाठी आयुष्यभर झगडणारे दिवंगत लोकनेते गोपीनाथराव मुंडे यांच्या स्मृती आजही जनमानसात किती खोलवर रुजलेल्या आहेत, याचा छोटासा पण अतिशय भावनिक करणारा अनुभव नुकताच पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी घेतला.**

समृद्धी महामार्गावर प्रवास करत असताना, बाजुच्या लेनमधून धावणाऱ्या दुसर्या एका गाडीतून अचानक एका महिलेनं हातात कागद घेत तो पंकजाताईंना दाखवण्याचा प्रयत्न केला. त्या कागदावर लिहिलं होतं ''आम्ही मुंडे साहेबांमुळेच इंजिनिअर झालो. प्रगती झाली. हा प्रसंग पाहून क्षणभर पंकजाताईंनाही भावनिक आठवणींनी ओथंबून टाकलं.





''मेसेज मुंडे साहेबांसाठी होता. समृद्धी मार्गाच्या वेगासही तो क्षणभर थांबवून गेला,'' अशा शब्दांत त्यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या आहेत. पंकजाताईंनी या हृदयस्पर्शी प्रसंगाचा व्हिडीओ आपल्या अधिकृत सोशल मीडिया खात्यावर पोस्ट करत तो अनुभव शेअर केला आहे. या व्हिडीओमुळे अनेकांना गोपीनाथ मुंडे यांच्या कार्याची आठवण झाली आणि अनेकांनी कमेंट्समधून आपल्या भावना व्यक्त केल्या. गोपीनाथराव मुंडे यांनी आयुष्यभर ग्रामीण, मागास, वंचित आणि शोषित घटकांच्या ◀◀ पान २ वर

# ब्लॅक बॉक्स डिकोडिंग सुरु

## एअर इंडियाकडील सर्व बोईंग ७८७ ड्रीमलायनर ताफ्याची तपासणी करणार

**अहमदाबाद । वृत्तसंस्था**

अहमदाबादमध्ये गुरुवारी झालेल्या एअर इंडिया विमान अपघातानंतर नागरी विमान वाहतूक मंत्री राम मोहन नायडू यांनी त्यांच्या पहिल्या पत्रकार परिषदेत सांगितले की, अपघातग्रस्त विमानाचा ब्लॅक बॉक्स मिळाला असून त्याचे डिकोडिंग सध्या सुरू आहे. या अपघाताच्या कारणांचा शोध घेण्यासाठी विविध यंत्रणा आणि उच्चस्तरीय समित्या सखोल ◀◀ पान २ वर



### पंतप्रधान मोदी ३ देशांच्या दौऱ्यावर

नवी दिल्ली : पंतप्रधान नरेंद्र मोदी रविवारी ३ देशांच्या दौऱ्यासाठी रवाना होतील. ते कॅनडामधील जी–७ शिखर परिषदेत सहभागी होतील. तसेच, सायप्रस आणि क्रोएशिया या देशांनाही भेटी देतील. सर्वप्रथम मोदी सायप्रसमध्ये दाखल होतील. त्या देशाला ◀◀ पान २ वर

# जिल्हाधिकाऱ्यांनी धरली चाड्यावर मूठ

## खंडाळा शिवारात सोयाबीनची केली पेरणी

**बीड । प्रतिनिधी**

**जिल्हाधिकारी म्हटल्यावर प्रशासनात रमणारा अधिकारी, कायम कामात व्यस्त असणारा महत्वाचा माणूस आपण जिल्हाधिकऱ्यांकडे पाहतो. मात्र बीडचे जिल्हाधिकारी हे यापेक्षा थोडे वेगळे असल्याचा अनुभव खंडाळा येथील शेतकऱ्यांना शनिवारी आला. जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी बीड तालुक्यातील खंडाळा या गावात जावून थेट सोयाबीनची पेरणी केली. तीही एकवेळ तिफणीच्या चाड्यावर मूठ ठेवून सोयाबीन पेरणी केली तर टोकन यंत्रांने सुध्दा पेरणी केली.**

पावसाळा सुरू होताच शेतकरी पेरणीच्या कामात व्यस्त असून, त्यांच्या या मेहनतीला प्रशासनाचा पाठिंबा असल्याचे प्रत्यक्ष कृतीतून दाखवत जिल्हाधिकाऱ्यांनी स्वतः खंडाळा येथील शेतकरी बाबासाहेब चिंतामन जायभाये यांच्या शेतमळ्यात उतरून सोयाबीनच्या बियाणांची मूठ चाड्यावर धरून पेरणी केली. तसेच जॉन्सन यांनी टोकन यंत्राच्या सहाय्याने सुध्दा सोयाबीनची पेरणी केली. यावेळी तहसीलदार चंद्रकांत शेळके, जिल्हा कृषी अधीक्षक सुभाष साळवे, मंडळ अधिकारी, कृषी सहाय्यक, ग्रामस्थ आणि शेतकरी मोठ्या संख्येने ◀◀ पान २ वर





### शेतकऱ्यांसाठी आनंददायी क्षण

स्वतः जिल्हाधिकारी आपल्या शेतात आले, त्यांनी थेट सोयाबीनची पेरणी केली. त्यामुळे खंडाळा येथील शेतकऱ्यांसाठी हा आनंददायी असा क्षण होता.

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.१३ जुन २०२५

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: ६०.५० क्विंटल | १,८७१ | २,७०० | २,४५० |
| ज्वारी/हायब्रिड : ५०.५० क्विंटल | १,८०० | २,५३५ | २,३५४ |
| मका/लोकल:५.०० क्विंटल | २,२०० | २,२०० | २,२०० |
| तूर : १५.०० क्विंटल | ५,८०० | ६,००० | ५,९३३ |
| उडीद : १.०० क्विंटल | ४,५०० | ४,५०० | ४,५०० |
| बाजरी:७.५० क्विंटल | १,७०० | २,४५० | २,१८० |
| मुग :१.५० क्विंटल | ६,००० | ६,००० | ६,००० |
| सोयाबीन:२.०० क्विंटल | ४,१०० | ४,२०० | ४,१५० |
| हरभरा: २८.५० क्विंटल | ५,०३१ | ५,३५१ | ५,२२४ |

cmyk

## अग्रलेख

# जागतिक बँकेकडून प्रशंसा

गेल्या ११ वर्षांमध्ये भारताने २७ कोटी नागरिकांची अतिदारिद्र्यातून मुक्तता केली आहे. तसेच याच कालावधीत भारतातील अतिदारिद्र्याचे एकंदर लोकसंख्येच्या तुलनेतील प्रमाणही २७.१ टक्क्यांवरुन ५.३ टक्क्यांपर्यंत घसरले आहे, असे जागतिक बँकेने आपल्या अहवालात स्पष्ट केले आहे. नुकताच हा अहवाल प्रसिद्ध करण्यात आला. जागतिक बँकेने विचारात घेतलेला कालावधी २०१२ ते २०२३ हा आहे. सध्याच्या केंद्र सरकारच्या विविध जनहित धोरणांमुळे दारिद्र्यानिर्मूलनात ही झेप घेणे भारताला शक्य झाले, अशी प्रशंसाही जागतिक बँकेने केली आहे. बँकेने जो कालावधी विचारात घेतलेला आहे, त्यातील ९ वर्षे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वातील केंद्र सरकारच्या सत्ताकाळातील आहेत, हे महत्त्वाचे आहे. तसेच केंद्र सरकारच्या ज्या योजनांना जागतिक बँकेने हे श्रेय दिले आहे, त्या योजनाही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याच पुढाकाराने हाती घेण्यात आल्या आहेत, ही बाबही विषेशत्त्वाने उल्लेखावी अशीच आहे.

अतिदारिद्र्याचा निकष जागतिक बँकेने प्रतिदिन ३ डॉलर्स किंवा त्याच्यापेक्षा कमीची प्राप्ती असा निर्धारित केला आहे. भारताच्या रुपयामध्ये ही रक्कम साधारणत: प्रतिदिन २५५ रुपये होते. २०२२ पूर्वी हा निकष २.१ डॉलर्स असा होता. तो वाढविला जाऊनही आता भारतात एकंदर लोकसंख्येच्या ५.३ टक्के नागरिक, किंवा १४० कोटी नागरिकांपैकी साधारणत: ८ कोटी नागरिक अतिदारिद्र्यारेषेच्या आत आहेत, असे या अहवालावरुन दिसून येते. संख्यात्मक दृष्टीने विचार करता, २०११-२०१२ या वर्षात भारतात अतिदारिद्र्यातील लोकांची संख्या ३४ कोटी ५० लाख इतकी होती. ती २०२२-२०२३ वर्षात केवळ ७ कोटी ५२ लाख इतकी राहिली आहे. भारतासारख्या मर्यादित स्रोत आणि मर्यादित संपत्ती असलेल्या देशाने दारिद्र्यानिर्मूलनात इतकी मोठी प्रगती करावी, हे निश्‍चितच कौतुकास्पद आहे. मे २०१४ मध्ये जेव्हा भारतात सत्तांतर झाले आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हाती देशाची सूत्रे आली, तेव्हा अनेक कथित विचारवंतांनी, 'देशाच्या अर्थव्यवस्थेचे आता काय होणार' असा निराशावादी सूर लावला होता. पंतप्रधान नरेंद्र मोदी हे काही डॉ. मनमोहनसिंग यांच्याप्रमाणे अर्थतज्ञ नाहीत. तेव्हा ते अर्थव्यवस्थेची वाटच लावतील, असा आधीच निष्कर्ष काढणारेही कमी नव्हते. सत्तेवर आल्यानंतर २ वर्षांतच, अर्थात २०१६ मध्ये १ हजार आणि ५०० रुपयांच्या नोटा चलनातून काढून टाकण्याचा निर्णय घेतला गेला, तेव्हा तर, आता देशाचे दिवाळेच वाजणार, अशी हाकाटी याच 'तज्ज्ञ' मंडळींकडून पिटण्यात आली होती. त्याआधी रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर आणि अर्थज्ञानमेरुमणी असा ज्यांचा डांगोरा याच लोकांनी पिटला होता, त्या रघुराम राजन यांना कालावधीवाढ न देण्याचा निर्णय घेण्यात आला होता. त्या निर्णयानंतर तर आता आकाशच फाटले, असा टाहो याच लोकांकडून फोडण्यात आला होता. त्यानंतरही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सरकारने अर्थविषयक अनेक निर्णय घेतले. त्यात वस्तू-सेवा कर प्रणाली देशभरात लागू करण्याचा निर्णय प्रमुख होता. हे वस्तू-सेवा कराचे किंवा जीएसटीचे प्रकरण या सरकारला पेलवणार नाही. छोट्या व्यापाऱ्यांची मोठी हानी होणार, अर्थव्यवस्था रसातळाला जाणार अशी जळकी भविष्यवाणी वर्तविण्यात आली होतीच. या सर्व ऊरबडवेगिरीला पुरुन उरुन २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत पुन्हा पूर्वीपेक्षा अधिक बहुमताने विजयी झाले. त्यानंतर त्वरित कोरोनाच्या विळख्यात साऱ्या जगासमवेत भारतही सापडला. ज्या कोरोनाला तोंड देता देता, अमेरिकेसारख्या अतिप्रगत आणि श्रीमंत देशाच्या नाकी नऊ आले, त्या कोरोनासमोर तोळामासा आर्थिक प्रकृतीचा भारत टिकून राहणार नाही, असे भाकित, अमेरिकेतील तज्ञांनी नव्हे, तर आपल्या देशातीलच तथाकथित पुरोगामी तज्ञांनी केले होते. पण त्या जागतिक संकटातही केंद्र सरकार इतर राज्यसरकारांसह ठामपणे उभे राहिले. कोरोनाच्या पहिल्या वर्षात अर्थव्यवस्थेची वाढ नकारात्मक झाली हे खरे. पण तसे होणे साहजिक होते. कारण, लॉकडाऊन आदी अनिवार्य उपाययोजनांमुळे आर्थिक व्यवहार ठप्प झाले होते आणि लोकांसमोर केवळ जिवंत राहणे हे ध्येय होते. जगाच्या आतापर्यंतच्या इतिहासातील सर्वात मोठा लसीकरण कार्यक्रम त्या काळात भारत सरकारने हाती घेतला आणि विक्रमी अल्पवेळेत पूर्णही करुन दाखविला. आर्थिक दृष्ट्या भारताला ती दोन वर्षे पुष्कळच आव्हानात्मक होती. पण त्यापुढच्या दोन वर्षांमध्ये तो खा भरुन काढून नव्या उत्साहात अर्थव्यवस्थेला प्रगतीच्या दिशेने मार्गस्थ करण्यासाठी प्रयत्न होत आहेत. हे सर्व सिंहावलोकन करण्याचे कारण असे, की २७ कोटी लोकांना अतिदारिद्र्यारेषेतून बाहेर काढण्याच्या या कार्यात, याच ९ वर्षांमध्ये सर्वाधिक आव्हाने आणि अडथळे निर्माण करण्याचा हेतुपुरस्सर प्रयत्न काही हितसंबंधियांकडून करण्यात आला होता. तो ओलांडून ही प्रगती करण्यात आली आहे. जनधन योजना, प्रधानमंत्री आवास योजना, उज्ज्वला योजना, गरीबांना विनामूल्य धान्य योजना आदी योजनांचा या प्रगतीत सिंहाचा वाटा आहे, हा जागतिक बँकेचा निष्कर्ष आहे. या योजना याच आव्हानात्मक काळात, साकारण्यात आल्या आहेत.

जनतेची दिशाभूल करण्यात येत आहे, असे आरोप होतील तथापि, ही आकडेवारी जागतिक बँकेने दिली आहे. त्यामुळे ती विश्वासार्ह मानण्यास प्रत्यवाय नसावा. त्यातूनही खुसपटे काढण्याचा प्रयत्न तथाकथित तज्ज्ञांकडून होईलच. कारण मूळ स्वभावाला औषध नसते. तसेच, एवढ्या प्रगतीवर सरकारनेही समाधानी होता कामा नये. कारण आव्हाने अद्यापही मोठी आणि जटील आहेत. ती पार करायला आणखी कसून प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे. पण, प्राप्त परिस्थितीत जी कामगिरी आतापर्यंत झाली आहे, ती पुढची अधिक अवघड चढण चढण्यासाठी उत्साहवर्धक आहे, हे निश्‍चित.

# जिल्हा वार्षिक योजना अंतर्गत प्राप्त निधी वेळेत खर्च करावा-पालकमंत्री पंकजा मुंडे

## जिल्हा वार्षिक योजना करीता ५१४.९६ कोटींचा निधीला मंजूर

**जालना । प्रतिनिधी**

**जिल्हा वार्षिक योजना सन २०२५-२०२६ अंतर्गत सर्वसाधारण योजना ४३६ कोटी, अनुसुचित जाती उपयोजना ७६ कोटी, आदिवासी क्षेत्राबाहेरील उपयोजना २.९६ कोटी असे एकूण ५१४.९६ कोटींचा निधी मंजूर झाला आहे. तरी सर्व शासकीय यंत्रणांनी प्राप्त निधी वेळेत खर्च करण्याच्या निर्देश राज्याच्या पर्यावरण व वातावरणीय बदल, पशुसवंर्धन मंत्री तथा जालना जिल्ह्याच्या पालकमंत्री श्रीमती पंकजा प्रज्ञा गोपीनाथ मुंडे यांनी दिले.**

येथील नियोजन भवनात आयोजित जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत श्रीमती पंकजा मुंडे या बोलत होत्या. यावेळी बैठकीस खासदार कल्याण काळे, आमदार राजेश राठोड, आमदार बबनराव लोणीकर, आमदार संतोष दानवे, आमदार नारायण कुचे, आमदार हिकमत उढाण, आमदार विक्रम काळे, जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ, प्रभारी जिल्हा पोलीस अधीक्षक अजयकुमार बन्सल, जिपचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी शिरिष बनसोडे, अप्पर जिल्हाधिकारी श्रीमती रिता मैत्रवार, निवासी उपजिल्हाधिकारी गणेश महाडिक, जिल्हा नियोजन अधिकारी सुनिल सुर्यवंशी यांच्या सह सर्व समिती सदस्य उपस्थित होते. पालकमंत्री पालकमंत्री श्रीमती पंकजा मुंडे पुढे म्हणाल्या की, जिल्ह्याला जिल्हा वार्षिक योजना सन २०२५-२०२६ अंतर्गत एकुण ५१४.९६ कोटी निधी मंजूर झाला आहे. याकरीता सर्व यंत्रणांनी योग्य नियोजन करुन कामाच्या याद्या तयार करुन त्यास वेळेत तांत्रिक व प्रशासकीय मंजूरी घेवून सर्व निधी वेळेत खर्च करण्याचे नियोजन करावे. सदर निधीतून कामे करतांना लोकप्रतिनिधींना विचारात घेवूनच निधी खर्च करावा. ज्या यंत्रणानी प्रास्तावित केलेला निधी वेळेत खर्च करणार नाहीत, त्याची सर्वस्वी जबाबदारी त्या संबंधीत यंत्रणा प्रमुखाची राहील याची दक्षता घ्यावी असेही त्यांनी सूचित केले. तसेच जिल्हा वार्षिक योजना सन २०२४-२०२५ अंतर्गत सर्वसाधारण योजना ३७७.६३ कोटी, अनुसुचित जाती उपयोजना ७५.६२ कोटी, आदिवासी क्षेत्राबाहेरील उपयोजना ३.१३ कोटी असे एकूण ४५६.३८ कोटींचा निधी खर्च झाल्याचे त्यांनी सांगितले. जिल्ह्यात अतिवृष्टी अनुदान वितरणात जो अपहार झाला आहे, तो निधी शासनाचा असून तो निधी सामान्य नागरिकांचा आहे. या प्रकरणांतीला दोषींवर कडक कारवाई झाली पाहिजे असल्याचे सांगत पालकमंत्री श्रीमती मुंडे म्हणाल्या की, पावसाला सुरुवात झाली असुन, शेतकऱ्यांनी खरिप पेरणीच्या कामास सुरुवात केली आहे. याकरीता शेतकऱ्यांचा पिक कर्जासाठी अर्ज प्राप्त होताच बँकांनी संबंधीतास तात्काळ कर्ज उपलब्ध करुन द्यावे. तसेच याबाबत जिल्हाधिकारी यांनी दर आठवड्याला बैठक घेवून पिक कर्ज वितरणांचा बँकांकडून आढावा घ्यावा. तसेच शेती व्यवसाय करतांना होणाऱ्या अनेक प्रकारच्या अपघातांमुळे शेतकऱ्यांचा मृत्यू झाल्यास किंवा त्याला अपंगत्व आल्यास त्यास तात्काळ गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा योजनेचा लाभ देण्यात यावा. जिल्ह्यातील लोकवस्ती आणि वाड्याची महावितरणने सिंगल फेजचे कनेक्शन तोडले असून, हे लोक अंधारात राहत आहे. तरी महावितरणने तात्काळ या लोकवस्ती आणि वाड्याना विज पुरवठा पूर्वरत करुन द्यावा. लोकप्रतिनिधींनी जिल्ह्यातील अनेक शाळेत विद्यार्थ्यांकरीता स्वच्छतागृह नसल्याचे सांगितले आहे. याकरीता लोकप्रतिनीधींच्या निधीतून २० टक्के निधी वापरून शाळेत स्वच्छतागृह करण्यात येईल. जिल्ह्यात वाळू माफिया अवैध वाळूची तस्करी करत असुन, प्रशासकीय अधिकारी-कर्मचाऱ्यांवर हल्ले देखील होत आहे. याकरीता महसूल आणि पोलीस यंत्रणांनी अशा माफियांवर कडक कायदेशिर कारवाई करावी. जिल्ह्यात पोलिस पाटील यांची अनेक पदे रिक्त आहे. याबाबत जिल्हा प्रशासनाने लवकरात लवकर नोटीफिकेशन काढून सदर पदांची लवकर भरती करावी. तसेच सर्व शासकीय कार्यालय स्वच्छ ठेवण्यासाठी राज्य शासनाने नुकताच शंभर दिवसाचा उपक्रम राबविला



होता. या उपक्रमापुरते काम न करता जिल्ह्यातील सर्व कार्यालय नेहमी स्वच्छ राहतील यासाठी प्रयत्न करावे. तसेच सर्व कार्यालयावर अपारंपरिक ऊर्जाचा वापर करावा. तसेच जालना शहरात उभारण्यात येणाऱ्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर स्मारकास आवश्यक तेवढा निधी उपलब्ध करुन देण्यात येणार असल्याचे पालकमंत्री श्रीमती मुंडे यांनी यावेळी सांगितले. प्रारंभी जिल्हा नियोजन अधिकारी सुनिल सुर्यवंशी यांनी जिल्हा नियोजन समिती समोर मागील बैठकीचे इतिवृत्त व अनुपलन अहवाल सादर केला. तसेच जिल्हा वार्षिक योजना सन २०२४-२०२५ अंतर्गत झालेला खर्च व सन २०२५-२०२६ चा प्रारूप आराखड्याची माहिती यावेळी दिली. शासनाने ठरवून दिलेल्या आर्थिक मर्यादेत जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) करीता रु. ३३२.२० कोटीचा प्रारुप आराखडा तयार करण्यात आला होता. राज्यस्तरीय बैठकीत ४६.०० कोटीच्या वाढीसह जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) सन २०२५-२६ करीता एकूण रक्कम रु. ४३६ कोटीचा निधी अर्थसंकल्पित करण्यात आला आहे. जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) सन २०२५-२६ करीता मंजूर तरतूदी : कृषी व संलग्नसेवा (पशुसंवर्धन, मत्स्यव्यवसाय, वने, सहकार) रु. २२.९६ कोटी ग्रामीण क्षेत्राच्या विकासाच्या योजना रु. २०.५० कोटी जलसंधारण विभागाच्या योजना रु. २४.१० कोटी ऊर्जा विकास ( व अपारंपारीक ऊर्जा ) रु. ३०.०० कोटी शिक्षण विभागाच्या योजना रु. २४.१७ कोटी महिला व बाल विकासाच्या योजना रु. २१.४० कोटी आरोग्य सेवांचे बळकटीकरण रु. ४८.९८ कोटी नगर विकास विभाग- रु. ७०.२६ कोटी रस्ते व परिवहन रु. ४५.५० कोटी पर्यटन, तिर्थक्षेत्र, संरक्षित स्मारके यांचे संवर्धन व विकास - रु. २५.५१ कोटी पोलिस व तुरुंग व्यवस्थेचे बळकटीकरण रु. १२.४० कोटी दिव्यांगांकरीता १ % राखीव रु. ४.१३ कोटी लोकप्रतिनिधी यांनी नियोजन समिती बैठकीत केलेल्या मागण्या व मांडलेले मुद्दे पुढीलप्रमाणे. खासदार डॉ. कल्याणराव काळे : जिल्हा प्रशासनाने अवैध वाळु उत्खनन व वाहतूक रोखण्यासाठी कठोर पावले उचलावीत. वाळुची तस्करी सुरु असल्याने मंजूर घरकुलांना वाळु मिळत नाही. जिल्ह्यात जागोजागी चेकपोस्ट उभारुन उच्च गतीने पळणाऱ्या हायवांवर कारवाई करावी. वन विभागात वन मजूरांना कामे न देता कंत्राटदाराकडून कामे करुन घेतली जात आहेत. त्यांची चौकशी करण्यात यावी. जालना शहरातील मोतीबाग तलावात एमआयडीसीच्या पाण्याचे प्रदुषण होत आहे. त्याला अटकाव करण्यात यावा. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर स्मारकास आवश्यक तेवढा निधी उपलब्ध करुन देण्यात यावा. आमदार नारायण कुचे : पोलिस पाटील पदांची भरती लवकरात लवकर करण्यात यावी. महावितरणने वाड्या वस्त्यांचा वीज पुरवठा तात्काळ सुरु करावा. वन विभागाला दिलेल्या १२ कोटींच्या निधींचा संबंधीताकडून खुलासा घ्यावा. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर स्मारकास आवश्यक तेवढा निधी उपलब्ध करुन देण्यात यावा. नाविण्यापूर्ण योजने अंतर्गत होणारी कामे करतांना लोकप्रतिनिधींना विचारात घ्यावे. यावेळी बैठकीस जिल्हा नियोजन समितीचे सदस्य आणि विविध विभागाचे विभाग प्रमुख यांची उपस्थिती होती.

# ट्रम्प यांच्या दाव्यावर मोदी गप्प का ; काँग्रेसकडून पुन्हा प्रश्न उपस्थित

**नवी दिल्ली । वृतसंस्था**

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या अलिकडच्या दाव्यांवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मौन सोडावे अशी मागणी काँग्रेसने शनिवारी केली. पक्षाने म्हटले आहे की, गेल्या एका महिन्यात अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षांनी १३ वेळा भारत आणि पाकिस्तानमधील युद्ध रोखल्याचा दावा केला आहे. त्यांच्या वारंवार दाव्यांनंतरही, पंतप्रधान मोदी अजूनही मौन धरून आहेत.

काँग्रेसचे संपर्क प्रमुख जयराम रमेश यांनी एक्स वर सांगितले की, ट्रम्प यांनी १० मे २०२५ ते १३ जून २०२५ या कालावधीत ३४ दिवसांत १३ वेळा ३ वेगवेगळ्या देशांमध्ये जाहीरपणे दावा केला की भारत आणि पाकिस्तानमधील युद्धबंदी त्यांच्यामुळेच झाली. अमेरिकेसोबतच्या व्यापाराच्या आमिषामुळे आणि दबावाच्या धोरणामुळे हे शक्य झाले, असा पुनरुच्चार त्यांनी केला. त्यांनी भारत आणि पाकिस्तान दोघांचेही समान कौतुक केले. काँग्रेसने विचारले आहे की, जर ट्रम्प यांचा दावा चुकीचा असेल तर भारत सरकार तो का नाकारत नाही? आणि जर तो बरोबर असेल तर देशाला त्याची माहिती का देण्यात आली नाही? रमेश म्हणाले की, देश दुःखात आहे. सीमेवर शांतता परतली आहे. परंतु अमेरिकन व्यासपीठांवरून भारताबद्दल एकामागून एक दावे केले जात आहेत. पंतप्रधान अजूनही मौन आहेत. तथापि, सरकारकडून अनेक व्यासपीठांवर असे म्हटले गेले आहे की १० मे रोजी भारत आणि पाकिस्तानच्या लष्करी ऑपरेशन्सच्या महासंचालकांमध्ये झालेल्या चर्चेनंतर परस्पर संमतीने लष्करी कारवाई थांबवण्यात आली. पण काँग्रेसचे म्हणणे आहे की ट्रम्प यांच्या दाव्यांमुळे भारताच्या परराष्ट्र धोरणावर प्रश्नचिन्ह उपस्थित होते. काँग्रेसचे मीडिया प्रभारी म्हणाले की, हे फक्त एक विधान नाही तर ते एक आव्हान आहे. जेव्हा भारताच्या सार्वभौमत्वावर प्रश्न उपस्थित केले जातात, तेव्हा सरकारने उत्तर दिले पाहिजे. त्यांनी सोशल मीडियावर ट्रम्प यांनी केलेल्या विधानांवर प्रकाशित झालेल्या बातम्यांची लिंक देखील शेअर केली. अमेरिकेशी संबंधित तीन अलीकडील घडामोडींना काँग्रेसने राजनैतिक अडचणी म्हणून संबोधले आहे. यामध्ये अमेरिकन जनरल मायकेल कुरिला यांनी पाकिस्तानला उत्कृष्ट दहशतवादविरोधी भागीदार म्हटले आहे, पाकिस्तानच्या लष्करप्रमुखांचे अमेरिकन सैन्य दिनाचे आमंत्रण आणि ट्रम्प प्रशासनाशी संबंधित लोकांचे भारत आणि पाकिस्तान एकत्र असल्याचे विधान यांचा समावेश आहे.

# पंकजा मुंडे यांच्या हस्ते पोलिस विभागाच्या १२ वाहनांचे लोकार्पण

जालना । प्रतिनिधी

जिल्हा पोलिस दलास जिल्हा नियोजन समितीच्या निधीतून १ कोटी ८२ लक्ष रुपयांचा निधी वितरीत करण्यात आला होता. या निधीतून पोलिस विभागाने एकुण १२ वाहने घेतली यात महिंद्रा स्कॉर्पिओ, बंदोबस्तासाठी मोटारगाड्या आणि पाण्याचे टँकर यांचा समावेश आहे. पालकमंत्री पंकजाताई मुंडे यांच्या हस्ते शनिवार दि.१४ जुन २०२५ रोजी दुपारी १.३० वाजता पोलिस कवायत मैदानावर नवीन वाहनांचे लोकार्पण करण्यात आले.

यावेळी खासदार डॉ.कल्याण काळे, आमदार बबनराव लोणीकर, आमदार संतोष दानवे, आमदार नारायण कुचे, आमदार विक्रम काळे, माजी आमदार अरविंद चव्हाण, जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ, पोलिस अधिक्षक अजयकुमार बन्सल, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी शिरिष बनसोडे, यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी पोलिस विभागाच्या वाहनांना पालकमंत्री पंकजा मुंडे यांच्यासह मान्यवरांच्या हस्ते हिरवी झेंडी दाखवून लोकार्पण करण्यात आले. तसेच पोलिस विभागाच्या वाहनांनी यावेळी पथसंचलन देखील केले.



## पान १ वरून...

### राज्यात मान्सूनची

मध्यम ते जोरदार पावसाची शक्यता आहे. घाटमाथ्यावर काही ठिकाणी मुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. मुंबई, पुणे, कोल्हापूर, नागपूर आणि छत्रपती संभाजीनगर परिसरात पावसाच्या सरी कायम राहतील. विदर्भात काही भागांत यलो अलर्ट जाहीर करण्यात आला आहे. नागरिकांनी काळजी घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे. पावसामुळे पेरणीसाठी पोषक वातावरण निर्माण झाले आहे. कोकण किनारपट्टीवर मान्सूनने नेहमीप्रमाणेच जोरदार सुरुवात केली आहे. रत्नागिरी, सिंधुदुर्ग, रायगड आणि पालघर जिल्ह्यांमध्ये गेल्या आठवड्यात सतत पावसाची नोंद होत असून अनेक ठिकाणी १०० मिमी पेक्षा जास्त पाऊस पडला आहे. मुंबईतही १२ जूनपासून पावसाने दमदार हजेरी लावली असून, गुरुवारी शहरात ८० मिमी तर उपनगरात ११० मिमी इतकी पावसाची नोंद झाली. त्यामुळे ठिकठिकाणी वाहतुकीस अडथळे आले असून बेस्टच्या काही बस सेवा विलंबाने धावत आहेत. नाशिक, पुणे, सातारा, सोलापूर, अहमदनगर या जिल्ह्यांमध्येही मान्सून सक्रिय झाला आहे. काही ठिकाणी पावसाची संततधार असून, शेतकऱ्यांनी पेरण्या सुरू करण्याची तयारी केली आहे. हवामान विभागाने सांगितले की, पुढील पाच दिवस मध्य महाराष्ट्रात विजांसह मध्यम ते जोरदार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. विदर्भातील नागपूर, अमरावती, चंद्रपूर, यवतमाळ, गडचिरोली आणि गोंदिया जिल्ह्यांत जोरदार पावसाने सुरुवात केली आहे. यवतमाळ जिल्ह्यात काही भागांत पूरसदृश परिस्थिती निर्माण झाली होती. नागपूरमध्ये १३ जूनला ७५ मिमी पावसाची नोंद झाली. भारतीय हवामान विभागाने यवतमाळ, वर्धा, चंद्रपूर येथे यलो अलर्ट जारी केला आहे.

---------------

### संभाजीनगर जिल्ह्यात वीज कोसळून

हवामान खात्याने पुढील काही दिवसांत कोकण, पश्चिम महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात पावसाचा जोर वाढण्याची शक्यता वर्तवली आहे. गेल्या १०-१२ दिवसांपासून विश्रांती घेतलेला मान्सून पुन्हा सक्रिय झाला असून, काही ठिकाणी ढगफुटीसदृश पाऊस पडत आहे. प्रशासनाने नागरिकांना सतर्क राहण्याचे आणि काळजी घेण्याचे आवाहन केले आहे.

----------

### बच्चू कडूंचे अन्नत्याग आंदोलन

असे म्हणत बच्चू कडू यांनी सरकारने आपल्या मागण्या विचार घेतल्याचे सांगत अन्नत्याग आंदोलन मागे घेतले. आपले अन्नत्याग आंदोलन आपण मागे घेत नसून पुढे ढकलत असल्याचे कडू यांनी म्हटले. दरम्यान, जर आमच्या मागण्या मान्य झाल्या नाहीत, तर उदय सामंत तुमच्या घराबाहेर आम्ही आंदोलन करू, असा इशारा बच्चू कडूंनी दिला. त्यानंतर, मंत्री उदय सामंत यांच्याकडून पाणी पिऊन कडू यांनी आपले आंदोलन मागे घेतले. सरकारच्यावतीने मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी शुक्रवारी बच्चू कडू यांनी भेटली होती. या भेटीत सरकारने त्यांच्या मागण्यांची गंभीरतेने दखल घेतली असून, मंत्रिमंडळ बैठकीत हा विषय पटलावर येईल, असे म्हटले होते. त्यानंतर, शनिवारी मंत्री उदय सामंत यांनी लेखी पत्र दिल्यानंतर बच्चू कडूंनी आपले उपोषण सोडले आहे. पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी क्आश्वासन दिले, तेच पत्र उदय सामंत यांनी बच्चू कडूंना दिले आहे. प्रहार जनशक्ती संघटनेचे प्रमुख बच्चू कडू यांचे गेल्या सहा दिवसापासून अमरावतीत अन्नत्याग आंदोलन सुरु होते. शेतक-यांच्या कर्जमाफीसह विविध मागण्यांसाठी हे अन्नत्याग आंदोलन करण्यात आले. अमरावतीचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळेंनी बच्चू कडूंची भेट घेत अन्नत्याग आंदोलन मागे घ्यावे, अशी विनंती केली होती. मात्र बच्चू कडू आपल्या मागण्यांवर आणि उपोषणावर ठाम होते.

---------

### मुंडे साहेबांमुळेच प्रगती झाली;

न्यायासाठी कार्य केलं. त्यांच्यामुळे अनेक विद्यार्थ्यांना शिक्षणाची, तरुणांना रोजगाराची आणि गरजूंना मदतीची संधी मिळाली. त्यामुळेच आजही अनेक कुटुंबं त्यांना ''देव'' मानतात. हा अनुभव केवळ भावनिक नसून, गोपीनाथराव मुंडे यांच्या कार्याचा जनमानसात किती दीर्घकालीन आणि खोलवर प्रभाव आहे, याचं जिवंत उदाहरण ठरला आहे.नेते आपल्यातून जातात, पण त्यांचं काम आणि त्यांची लोकांच्या हृदयामधील जागा कायम राहते. मुंडे साहेबांनी ही जागा आपल्या कार्यातून निर्माण केलेली आहे, हेच या प्रसंगातून पुन्हा एकदा सिद्ध झालं.

--------------

### चाकरवाडी येथील शिवपुराण कथा

आलेला असून, याबद्दल धनंजय मुंडे यांनी आयोजकांचे आभार मानले.

--------------

### पंतप्रधान मोदी ३

२ दशकांहून अधिक काळानंतर भेट देणारे ते पहिलेच भारतीय पंतप्रधान ठरतील. परदेश दौऱ्याच्या दुसऱ्या टप्प्यात मोदी १६ आणि १७ जून यादिवशी कॅनडामध्ये असतील. त्या देशाचे पंतप्रधान मार्क कार्नी यांच्या निमंत्रणावरून ते जी-७ परिषदेला उपस्थित राहतील. त्यामुळे सलग सहाव्यांदा जी-७ परिषदेत मोदींच्या सहभागाची नोंद होईल. संबंधित परिषदेत महत्वाच्या जागतिक मुद्द्यांवर चर्चा अपेक्षित आहे. जी-७ गटामध्ये अमेरिका, ब्रिटन, कॅनडा, फ्रान्स, जर्मनी, इटली आणि जपान या देशांचा समावेश आहे. त्यामुळे संबंधित देशांच्या प्रमुखांशी द्विपक्षीय चर्चा करण्याची संधीही मोदींना उपलब्ध होणार आहे. मागील काही काळापासून भारत आणि कॅनडामधील संबंध ताणले गेल्याचे चित्र आहे. ते संबंध सुरळित करण्याच्या दृष्टीने जी-७ परिषदेला महत्व प्राप्त झाले आहे.

-----------

### ब्लॅक बॉक्स डिकोडिंग

चौकशी करत आहेत. मंत्री राम मोहन नायडू म्हणाले, या दुर्घटनेनंतर एअर इंडिया कंपनीच्या बोईंग ७८७ ड्रीमलायनर ताफ्याची तपासणी सुरू करण्यात आली आहे. भारतात सध्या असलेल्या ३४ ड्रीमलायनर विमानांपैकी आठची आधीच तपासणी झाली आहे. एअरक्राफ्ट ॲक्सिडेंट इन्व्हेस्टिगेशन ब्युरोने तत्काळ घटनास्थळी जाऊन तपास सुरू केला आहे. तांत्रिक तपास करणाऱ्या पथकाने शुक्रवारी सायंकाळी ५ वाजता घटनास्थळी ब्लॅक बॉक्स हस्तगत केला. या ब्लॅक बॉक्सचे डिकोडिंग केल्यावर अपघाताच्या क्षणी किंवा अपघात होण्याआधी नक्की काय घडले होते याचा सखोल तपशील समोर येईल. आम्ही सुद्धा एएआयबीकडून होणाऱ्या संपूर्ण चौकशीचा अहवाल आणि निष्कर्ष काय असतो याची आतुरतेने प्रतीक्षा करत आहोत, असे ते म्हणाले.

------------

### जिल्हाधिकाऱ्यांनी धरली

उपस्थित होते. यावेळी जिल्हाधिकाऱ्यांनी शेतकऱ्यांशी संवाद साधून शेतीसंदर्भातील अडचणी जाणून घेतल्या आणि शासनाच्या विविध योजनांची माहिती दिली. कृषी विभागाच्या वतीने योग्य बियाणे, खतांचा पुरवठा व सल्ला वेळेत मिळावा, यासाठीही सूचना देण्यात आल्या. जिल्हाधिकाऱ्यांच्या या सकारात्मक भूमिकेचे सर्वत्र कौतुक होत आहे.

------------

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

रविवार दि. १५ जून २०२५




## सुनेचा पैशासाठी शारीरिक व मानसिक छळ ;गुन्हा दाखल

परळी वैजनाथ । प्रतिनिधी

संपूर्ण राज्यात गाजत असलेल्या हगवणे प्रकरणाची पुनरावृत्तीच वाटावी अशा प्रकारची घटना परळीतही समोर आली आहे. परळीतील एका प्रतिष्ठित कुटुंबातील सुनेला पैशासाठी शारीरिक व मानसिक छळाला सामोरे जावे लागले आहे. याप्रकरणी आता पीडित सुनेने पती व सासरच्या नातेवाईकां विरुद्ध परळी शहर पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली असुन त्याप्रमाणे गुन्हाही दाखल करण्यात आला आहे.

याबाबत पोलीस सूत्रांकडून प्राप्त अधिक माहितीनुसार, परळीतील जयनगरमधील रहिवाशी पिडित विवाहितेने परळी शहर पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्याप्रमाणे तिचा लग्नापासून २००८ ते २०२२ दरम्यान माहेरहून पैसे घेवुन ये या कारणांवरुन वेळोवेळी शारीरीक मानसिक छळ केला गेला.तसेच अनैसर्गिक शारीरिक संबंध वगैरे सततचा त्रास दिला.याबाबत विरोध केला असता पतीने गळा दाबून जीवे मारुन टाकण्याचा प्रयत्न केला.सासऱ्याकडे याबाबत सांगायला गेलं तर सासऱ्याने त्रास देत गळा दाबून मारण्याचा प्रयत्न केला. सासरच्या मंडळींकडून मोठमोठ्या रकमेची मागणी व अर्थिक कारणास्तव सातत्याने शारीरिक व मानसिक छळ केला गेला. या फिर्यादीवरून आरोपी तिचा नवरा राजेंद्रकुमार रामचंद्र ईप्पर, सासरा रामचंद्र ईप्पर रा. चैतन्यनगर नांदेड यांच्यासह सासु, दीर, नणंद अशा पाच जणांविरुद्ध गुरनं. १२५/२०२५ कलम ३०७, ३७७, ४९८ (अ), ३२३, ५०४, ५०६, ३४ भादंवि प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास सपोनि गट्टूवार हे करीत आहेत.

## मराठवाड्यात १६ जूनला तर विदर्भात २३ जूनला शाळा सुरु होणार, शिक्षण विभागाची अधिकृत सूचना

**मुंबई । प्रतिनिधी**

राज्यात विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक वर्षाची सुरुवात विदर्भ वगळता इतर सर्व विभागांत सोमवार १६ जून रोजीपासून सुरु आहे. तर विदर्भात सोमवार दिनांक २३ जून २०२५ पासून होणार आहे. शाळा सुरू होण्याच्या पहिल्या दिवशी 'शाळा प्रवेशोत्सवा'च्या माध्यमातून विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यात येणार आहे, अशी माहिती शालेय शिक्षण विभागाने दिली.



शाळेची गुणवत्ता वृद्धिंगत करण्यासाठी आणि मुलांची उपस्थिती वाढवण्याकरीता शालेय शिक्षण विभागामार्फत संपूर्ण राज्यात 'शाळा प्रवेशोत्सव' उपक्रम साजरा करण्यात येणार आहे. 'शाळा प्रवेशोत्सव' उपक्रमांतर्गत मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, सर्व मंत्र्यांना नजिकच्या शासकीय, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळेमध्ये भेट देण्यासाठी कार्यक्रमाचे नियोजन करण्यात आलंय. या माध्यमातून विद्यार्थ्यांची शैक्षणिक गुणवत्ता, मोफत पाठ्यपुस्तके, मोफत शालेय गणवेश आणि इतर सोयी सुविधांचा आढावा घेण्यात येणार आहे. त्याचबरोबर शाळा व्यवस्थापन समिती, सरपंच, ग्रामपंचायत सदस्य, नगरसेवक यांच्याशी चर्चा करुन विद्यार्थ्यांचा स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळेत प्रवेश घेण्याकडे कल कसा वाढेल, यासाठी आवश्यक उपाययोजना सुचवण्यात आल्या आहेत. राज्यातील लोकप्रतिनिधींबरोबरच वरिष्ठ अधिकाऱ्यांनी देखील शाळा सुरू होण्याच्या पहिल्या दिवशी शाळांना भेट द्यावी. याबाबत मुख्य सचिव सुजाता सौनिक यांनी नुकताच आढावा घेतलाय. सर्व विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी, महानगरपालिकांचे आयुक्त, जिल्हा स्तरावरील विविध विभागांचे अधिकारी यांनी शाळांना भेट देऊन विद्यार्थ्यांचे स्वागत करावे. तसेच शिक्षणाचा दर्जा सुधारण्यासाठी आणि शाळांच्या सर्वांगीण विकासासाठी उपाययोजना सूचवाव्यात, असे आवाहन त्यांनी केले.विद्यार्थ्यांमध्ये संख्याज्ञान व कौशल्य विकसित करण्यासाठी राज्यात निपूण महाराष्ट्र अभियान राबविण्यात येत आहे. याअंतर्गत दुसरी ते पाचवीच्या वर्गातील किमान ७५ टक्के विद्यार्थ्यांना इयत्तेनुसार अध्ययन क्षमता प्राप्त करणे हे ध्येय आहे. या कार्यक्रमांतर्गत पालकांचा अपेक्षित प्रतिसाद मिळण्याकरिता शासनाचे अपर मुख्य सचिव, प्रधान सचिव, सचिव यांनी 'शाळा प्रवेशोत्सव' कार्यक्रमामध्ये पालकांशी हितगुज साधावे. तसेच सर्व अधिकाऱ्यांना दत्तक शाळा घेण्याबाबत जबाबदारी देण्यात आली आहे, त्यानुसार सचिवांनी देखील पुढाकार घेऊन राज्याची शैक्षणिक गुणवत्ता वाढीसाठी सहकार्य करावे, अशी विनंती शालेय शिक्षण विभागाच्या प्रधान सचिव आय.ए.कुंदन यांनी केली आहे. शाळेस भेट देत असताना शाळेतील भौतिक सुविधांचा दर्जा, विद्यार्थ्यांच्या खेळांच्या सुविधांचा दर्जा, शाळेतील पूरक व्यवस्था, शालेय व्यवस्थेचा दर्जा, विद्यार्थ्यांच्या स्वच्छतेच्या सवयी, प्रधानमंत्री पोषणशक्ती योजनेंतर्गत देण्यात येणारा पोषण आहार आदी विविध विषयांबद्दल मार्गदर्शन केले जाणार आहे. या भेटीमुळे समाज, पालक, विद्यार्थी, शिक्षक यांचा शिक्षणाकडे पाहण्याचा दृष्टीकोन सकारात्मक होण्याबरोबरच बालकांना आत्मविश्वासपूर्वक व्यक्त होण्याची संधी दिली जाईल. त्याचबरोबर दर्जेदार शिक्षणाची संधी उपलब्ध होणार असल्याचा विश्वास श्रीमती कुंदन यांनी व्यक्त केला आहे.



## जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी केली बिंदुसरा तलावाची पाहणी

**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी शहराच्या पाणीपुरवठ्याचा महत्त्वाचा स्रोत असलेल्या बिंदुसरा तलावाची पाहणी केली. जलव्यवस्थापनाची स्थिती जाणून घेतली.

पाहणीदरम्यान जिल्हाधिकाऱ्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना स्पष्ट सूचना दिल्या. तलाव परिसरात स्वच्छता आणि सुरक्षा व्यवस्था सुधारावी. असे ते म्हणाले.या वेळी तहसीलदार चंद्रकांत शेळके, तसेच स्थानिक प्रशासनातील अधिकारी उपस्थित होते.



**बीड : माजी मंत्री आ. धनंजय मुंडे यांनी बीड येथे अशोकराव हिंगे यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट दिली त्या ठिकाणी बीड जिल्हा सहकारी बोर्डाच्या उपाध्यक्ष पदी निवड झाल्याबद्दल सुहास पाटील यांचा सत्कार केला.याप्रसंगी नारायण बप्पा शिंदे,नगरसेवक रमेश चव्हाण, अशोक वाघमारे, विलासराव विधाते, विनोदराव मुळूक, गणेश तांदळे, प्रभाकर पोफळे,शिक्षक नेते सुनील कुर्लेकर, सुनील सुरवसे, गहिनीनाथ मस्के, ओंकार पाटील, विशाल सोनवणे आदी**

## पिंपळवंडी-अंमळनेर परिसरात वादळी वाऱ्यासह पावसाचे थैमान, अनेकांचे नुकसान

### घरावरील पत्रे उडाले, झाडे रस्त्यावर पडल्याने रस्ता पडला बंद, फळबागांचे नुकसान, आ.धस यांच्या कार्यकर्त्यांनी रस्त्यावर आलेले अडथळे दुर करुन रस्ता केला सुरळीतपणे

पिंपळवंडी । प्रतिनिधी

पाटोदा तालुक्यातील पिंपळवंडी, अंमळनेर, कोतन,गांधनवाडी, पांढरवाडी, सकुंडवाडी,मिसाळवाडी, डागाचीवाडी, खोपटी आदी परिसरात बुधवारी सायंकाळी ४:०० वाजेच्या दरम्यान पावसाने वादळीवाऱ्यासह थैमान घातल्याने अनेकांच्या घरावरील पत्रे उडाले तर शेतामधील, आंबा, लिंबुनीच्या बागा, कांदा, विजेचे खांब, आणि मोठ-मोठी झाडे उन्मळुन पडल्याने शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. दरम्यान आ. सुरेश धस यांनी शासकीय यंत्रेला तातडीने पंचनामे करण्याचे आदेश दिल्याने अधिकारी वर्ग पंचनामे करण्यासाठी सकाळीच गावागावात पोहचल्याचे दिसुन आले तर आ. सुरेश धस यांनी देखील गावागावात भेटी देत नुकसानग्रस्त ठिकाणी भेटी देऊन शेतकऱ्यांना दिलासा दिला. यावेळी भाजपा युवानेते भाऊसाहेब भवर दे देखील उपस्थित होते. कार्यकर्त्यांनी रस्त्यावर येत जेथे झाडे कोसळुन रस्ता बंद पडला होता तिथे उपस्थित राहुन रस्त्यावर आलेले अडथळे दुर करीत रस्ते सुरळीतपणे करुन दिले. पिंपळवंडी येथे सरपंच निलेश मोरे, दादासाहेब पवार, अंमळनेर येथे गणप्रमुख महावीर पवार,



सरपंच गोविंद गाडे, पांढरवाडीफाटा येथे सरपंच अशोक जेधे, उपसरपंच भाऊसाहेब ससे, कोतन येथे सरपंच महेश खेंगरे, यांच्यासह आ. सुरेश धस यांचे कार्यकर्ते शेतकऱ्यांना आधार देत बांधावर दिसुन आले. या वादळीवाऱ्याने शेतकरी, व्यापारी, यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. तर रात्री उशिरापर्यंत बीड - अहिल्यानगर मार्गावर अनेक ठिकाणी वृक्ष कोसल्यामुळे वाहतुक बंद पडली होती. विजेची अनेक खांबे कोसळल्याने विजपूरवठा बंद पडला आहे. विजपूरवठा सुरळीतपणे करण्यासाठी उप अभियंता सावकारे एम.एच., इंजिनिअर कदम ए.बी., वायरमन महाडिक के.वाय., प्रधानतंत्र भाकरे आदी ठिकठिकाणी भेटी देऊन लवकरात लवकर विजपूरवठा सुरळीतपणे करण्यासाठी तत्पर दिसुन आले. मिसाळवाडी येथे शहादेव मिसाळ यांच्या घरावरील पत्रे उडुन गेले तर अभिमान पवार यांचे शेड उडुन गेले, पिंपळवंडी, खोपटी, कोतन, गांधनवाडी, पांढरवाडी येथे अनेक शेतकऱ्यांचे नुकसान झाली आहेत.

## जामखेड शहरात अनेक ठिकाणी घाणीचे साम्राज्य, उघड्यावरच लघुशंका, नागरिकांचे आरोग्य धोक्यात

जामखेड । प्रतिनिधी

'स्वच्छ जामखेड, सुंदर जामखेड' असा संदेश जामखेड शहरात वेगवेगळ्या भिंतीवर रंगवून दिलेला आहे. पण प्रत्यक्षात मात्र जागोजागी कचऱ्याचे ढिगारे आहेत. अनेक ठिकाणी रस्त्यावर उघड्यावर लघुशंका करतात. याची दुर्गंधी परिसरात पसरते. लाखो रूपयांचे स्वच्छतेचे टेंडर निघतात. प्रत्यक्षात कोठेही स्वच्छता करताना दिसत नाहीत फक्त भिंती रंगवून कागदोपत्रीच स्वच्छता अभियान कार्यक्रम दाखवला जातो आणि लाखो रूपयांचा मलिदा हडप केला जातो. याकडे अधिकारी व पदाधिकारी यांचे अर्थपूर्ण दुर्लक्ष होत आहे. बस स्थानक परिसरात तर महिला व नागरिकांच्या समोरच अनेक



लोक उघड्यावरच लघुशंका करतात सगळीकडे घाणीचे साम्राज्य पसरले आहे.

जामखेड शहरात सगळीकडे मोठ्या प्रमाणावर घाणीचे साम्राज्य पसरले असून, मोकाट कुत्रे, जनावरे व डुक्करांचा मुक्त संचार रस्त्यावर आहे. यामुळे डासांची संख्या वाढली असून डेंग्यू मलेरिया साथीची आजार वाढले आहेत. जामखेड नगरपरिषद म्हणजे असून अडचण व नसून खोळंबा अशी अवस्था निर्माण झाली आहे. बस स्थानक परिसर, तहसील परिसर, ग्रामीण आरोग्य केंद्र, महावितरण परिसर या सह अनेक ठिकाणी उघड्यावर लघुशंका करतात यामुळे महिला व मुलींची मोठ्या प्रमाणात कुचंबना होत आहे. तसेच अनेक ठिकाणी कचरा आहे. जामखेड शहर समस्यांच्या विळख्यात सापडले आहे. अनेक ठिकाणी कचरा, घाणीचे साम्राज्य, अनेक भागात उघड्यावर लघुशंका यामुळे डासांचा प्रादुर्भाव तसेच घाण तसेच महिलांसाठी स्वच्छता गृह नसल्याने कुचंबणा होते तसेच अनेक ठिकाणी उघड्यावर लघुशंका यामुळे शालेय विद्यार्थी व महिलांची कुचंबना होते. तसेच डासांचा प्रादुर्भाव होतो. घाणीमुळे डुक्करांचा मुक्त संचार, मोकाट जनावरे यामुळे जामखेड शहरातील नागरिक त्रस्त झाले आहेत. जामखेड शहरात मोकाट कुत्र्यांचा सुळसुळाट वाढला आहे. गल्लोगल्ली ही संख्या वाढत असून, नागरिकांना त्यांचा उपद्रव सहन करावा लागत आहे. ही कुत्री अंगावर येत असल्याने लहान मुले व वयोवृद्धांना शहरातून वावरताना दक्षता घ्यावी लागते. मोटारसायकलस्वारांच्या मागे कुत्री लागत असल्याने मोटारसायकल चालविताना कसरत करावी लागत आहे. नगरपरिषदेने या कुत्र्यांचा बंदोबस्त करावा, अशी मागणी नागरिक करीत आहेत. कुत्रे, डुकरे यांच्या उपद्रवाबरोबरच घाणीच्या साम्राज्य मुळे डासांचा उपद्रव वाढला आहे यामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे.

## लष्करी सैनिकाचा विजेचा शॉक लागून मृत्यू



परतुर(प्रतिनिधी ) लष्करी सैनिक या पदावर कार्यरत असलेला मंठा तालुक्यातील गारटेकी येथील पवन शेषराव पवार (वय ३३) यांचा विजेचा शॉक लागून दुर्दैवी मृत्यू झाला आहे. ही घटना दिनांक १३ जून रोजी घडली. पवन पवार सध्या सुट्टीवर त्याच्या गावी आले होते. झाडाची फांदी तोडत असताना त्यांना विजेचा जोरदार शॉक बसला. तातडीने त्यांना रुग्णालयात नेण्यात आले, मात्र उपचारापूर्वीच त्यांचे निधन झाले.

लान्स नायक पवन पवार यांनी भारतीय सैन्यात तब्बल १३ वर्षे कर्तव्य बजावले. सध्या ते आसाममधील ईएमई बटालियनमध्ये कार्यरत होते. लष्करात त्यांनी अनेक महत्त्वाच्या मोहिमांमध्ये सहभाग घेतला होता. त्यांची शिस्त, देशभक्ती आणि निष्ठा चांगल्या रिती पार पाडली होती.

१४ जून रोजी त्यांच्या पार्थिवावर मंठा तालुक्यातील गारटेकी या गावात शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले. या अंत्यसंस्काराला लष्कराचे अधिकारी, पोलीस प्रशासन, ग्रामस्थ आणि विविध क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. अंत्ययात्रा गावातून निघताना संपूर्ण परिसरात हळहळ आणि अश्रूंचा पूर उसळला.

पवन पवार यांच्या पश्चात पत्नी, एक लहान मुलगी, आई-वडील आणि भाऊ असा परिवार आहे. त्यांच्या अचानक जाण्याने पवार कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

## नैसर्गिक आपत्ती अनुदान वाटप घोटाळ्यात १० तलाठी निलंबित

**जालना । प्रतिनिधी**

नैसर्गिक आपत्ती अनुदान वितरणाच्या अपहारित रकमेबाबत २५ तलाठी दोषी आढळून आले होते. त्यापैकी प्राथमिक स्तरावर जिल्हा प्रशासनाने १३ जून रोजी १० तलाठ्यांचे निलंबन केले आहे. याशिवाय इतर तलाठ्यांचे खुलासे घेऊन, त्यानुसार अभिलेख तपासून दोषींवर कारवाई करण्यात येणार असल्याचे जिल्हाधिकारी यांनी कळविले आहे.




नैसर्गिक आपत्ती अनुदान वितरणात अंबड व घनसावंगी तालुक्यात एकूण ३५ कोटी रुपयांचा घोटाळा झाल्याचा अहवाल चौकशी समितीने दिला होता. यात दोन्ही तालुक्यातील २५ तलाठी, काही ग्रामसेवक व कृषी सहायकाचा समावेश होता. यापैकी बहुतांश तलाठ्यानी १ कोटी रुपयापेक्षा जास्तीच्या रक्कमेचे अतिरिक्त वितरण केल्याचे समोर आलेले होते. यात मग बोगस क्षेत्रवाढ, निलंबीत तलाठी गणेश मिसाळ, कैलास घारे, बाळू सानप, पवन सुलाने, शिवाजी ढालके, कल्याण बमनावत, सुनिल सोरमारे, प्रविण शिनगारे, बी.आर. भुसारे या तलाठ्यांनी जमिनीवर अनुदान देने, ८ अ उताऱ्यात नाव नसताना अनुदान देणे, तसेच दुबार अनुदान वितरित करणे इत्यादी बाबींचा समावेश केलेला आहे. यामुळे तलाठ्यांना निलंबित करण्यात आला आहे.या प्रकरणी सर्व २५ तलाठ्यांना नोटीसा काढून त्यांचे म्हणणे मांडण्यासाठी ४८ तासांचा अवधी जिल्हा प्रशासनाने दिला होता. आज बहुतेक तलाठ्यांनी आपले खुलासे सादर केले असून त्यांचे खुलासे समाधानकारक नसल्याने १० तलाठ्यांवर निलंबनाची कारवाई करण्याचे आदेश जिल्हाधिकारी डॉ. पांचाळ यांनी दिले आहेत. परंतु तलाठ्यांनी काय खुलासा सादर केला याची माहिती प्रेस नोट माध्यमातून जनतेसमोर आर डी गणेश महाडिक का देत नाही अशी पण उलट सुलट चर्चा सुरू आहे.

## जिल्हास्तरीय बॅडमिंटन स्पर्धेत उर्जित गिरवलकरचे यश

**परळी । प्रतिनिधी**

**महाराष्ट्र राज्य बॅडमिंटन असोसिएशन अंतर्गत बीड जिल्हा बॅडमिंटन असोसिएशन व चंपावती क्रीडा मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने नुकत्याच बीड जिल्हास्तरीय बॅडमिंटन स्पर्धा दिनांक १० व ११ जून २०२५ रोजी बीड येथे संपन्न झाल्या. या स्पर्धेत परळी येथील उर्जित मधुकरअप्पा गिरवलकर याने ११ वर्षाखालील वयोगटात एकेरी स्पर्धेत द्वितीय क्रमांक मिळवत घवघवीत संपादन केले आहे.**

उर्जित हा परळी येथील श्री वीरभद्रेश्वर प्राथमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री.मधुकरअप्पा गिरवलकर यांचा मुलगा आहे



लहानपणापासूनच एक वेगळे क्षेत्र निवडत तो प्रशिक्षक चेतन पांडे यांच्या मार्गदर्शनाखाली बॅडमिंटनचे धडे गिरवत आहे.त्याच्या या यशाबद्दल बीड जिल्हा बॅडमिंटन असोसिएशनचे अध्यक्ष अमरसिंह पंडित, आमदार विजयराजे पंडित,बीड जिल्हा बॅडमिंटन असोसिएशनचे सचिव डॉ.बळीराम गवते यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवरांकडून शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

पान ६ वरून...

### माऊली दादाच्या त्यागाने

सावता माळी, गोरोबा कुंभार, अशी खूप मोठी संत परंपरा महाराष्ट्राला वैभव प्राप्त करून देते.तर माऊली दादा सारख्या संतांमुळे महाराष्ट्राचे वैभव उच्च शिखरावर पोहोचले आहे. कीर्तन, भजन, सप्ताह या माध्यमातून समाज प्रबोधन, अंधश्रद्धा निर्मूलन, समाज परिवर्तनचे मोठा काम माऊली दादांनी केले आहे. माऊली दादा हे करुणेचा सागर होते, लेकरासारखी माया करत होते म्हणून सर्व लेकरं माऊली दादांच्या हाकेला धावूत येत होते. त्यांच्यामुळेच आज धर्म रक्षणाचे काम होत आहे.असे प्रतिपादन ह. भ. प. संदीपान महाराज हासेगावकर यांनी केले. या वेळी तपोनिधी शांतीब्रह गुरुवर्य महादेव महाराज तात्या चाकरवाडीकर, नारायण महाराज भाऊ उत्तरेशोर पिंप्री, माजी मंत्री आ.धनंजय मुंडे,ज्येष्ठनेते नंदकिशोर मुडदा, आदींसह राज्यभरातून आलेले भाविक उपस्थित होते.

मान्यवरची उपस्थिती

ह. भ. प. लक्ष्मण महाराज मेंगडे, बँकटस्वामी संस्थान, माजी मंत्री धनंजय मुंडे,ह. भ. प. रामकृष्ण रांधवे बापू महाराज,ह.भ.प.नाना महाराज कदम, ह. भ. प. सुरेश महाराज जाधव, नंदकिशोर मुडदा, रमेश आडसकर यांची उपस्थिती होती.

### आ.संदीप क्षीरसागरांच्या

तयार झालेले आणि मातीशी नाळ असलेले नेतृत्व होते. राजकीय आणि सामाजिक क्षेत्रात स्व.मेटे साहेबांचे योगदान अविस्मरणीय आहे. मेटे साहेबांनी पाहीलेली स्वप्ने पूर्ण करण्याचा मी कायम प्रयत्न करत आहे. स्व.साहेबांनी पाहिलेले बंधारा कम पुलाचे स्वप्न आता पूर्णत्वाकडे जात आहे. मेटे साहेबांनी आपल्या उभ्या कारकीर्दीत मराठा आरक्षणाचा प्रश्न कायम लावून धरला. त्याच भूमिकेला धरून मीही मराठा आरक्षणाच्या मागणीवर पाठपुरावा केला. यासोबतच बीड पंचायत समितीच्या आवारात स्व.मेटे साहेबांचा पुतळा बसविण्यासाठी माझा पाठपुरावा सुरू असून लवकरच पुतळा उभा राहिलेला असेल. स्व.मेटे साहेबांचे अधूरे स्वप्न पूर्ण करण्यासाठी मी कायम प्रयत्नशील असल्याची भावना आ.संदीप क्षीरसागरांनी यावेळी व्यक्त केली.

राज्य लोकतंत्र
शेत-शिवार
रविवार, दि. १५ जुन २०२५
४

# सेंद्रिय शेतीच्या माध्यमातून देशात घडतंय परिवर्तन

## अर्थव्यवस्था ही होतेय मजबूत; शेतकऱ्यांचा सर्वार्थाने शाश्वत विकास

पतंजली आयुर्वेदचा दावा आहे की ते भारतातील शेतीमध्ये परिवर्तन घडवत आहे आणि कंपनी सेंद्रिय शेतीला प्रोत्साहन देऊन माती निरोगी आणि शेतकऱ्यांना स्वावलंबी बनवत आहे. कंपनीचे म्हणणे आहे की बाबा रामदेव आणि आचार्य बालकृष्ण यांच्या नेतृत्वाखाली पतंजली भारतीय शेती मजबूत आणि शाश्वत बनवण्यासाठी काम करत आहे. कंपनीचा दावा आहे की, ''पतंजलीचा किसान समृद्धी कार्यक्रम शेतकऱ्यांना सेंद्रिय शेती शिकवतो. तो पीक फेरपालट, हिरवळीचे खत बनवणे आणि कंपोस्ट तयार करणे यासारख्या सोप्या पद्धती शिकवतो. यामुळे रासायनिक खतांची गरज कमी होते. पतंजलीने पिकांना मजबूत आणि निरोगी ठेवणारी सेंद्रिय खते आणि माती सुधारणा उत्पादने विकसित केली आहेत.

तंत्रज्ञानाच्या क्षेत्रातही पाऊल पतंजलीच्या ॲपवरून शेतकऱ्यांना योग्य माहिती

कंपनीने म्हटले आहे की, ''पतंजलीच्या कॉन्ट्रॅक्ट फार्मिंग आणि डिजिटल ॲपवरून शेतकऱ्यांना योग्य किंमत आणि बाजारपेठेची



माहिती मिळते. कंपनी मध्यस्थांशिवाय थेट पिके खरेदी करते, ज्यामुळे शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढते.'' तसेच, पतंजली ग्रामीण महिलांना औषधी वनस्पती लागवडीचे प्रशिक्षण देऊन त्यांना स्वावलंबी बनवत आहे. ''

सेंद्रिय शेतीमुळे पाणी स्वच्छ आणि माती ही चांगली : पतंजली कंपनीचे म्हणणे आहे की, ही चळवळ पर्यावरणासाठीही चांगली आहे. सेंद्रिय शेतीमुळे माती सुधारते, पाणी स्वच्छ राहते आणि वनस्पती आणि प्राण्यांची विविधता वाढते. जुन्या भारतीय कृषी ज्ञानाला नवीन तंत्रांशी जोडून पतंजली आपली संस्कृती देखील वाचवत आहे.

पतंजलीचे प्रयत्न गावांची अर्थव्यवस्था ही करतेय मजबूत : कंपनीचा दावा आहे की, ''पतंजलीचा हा प्रयत्न शेतकऱ्यांचे जीवनमान सुधारत आहे आणि गावांची अर्थव्यवस्था मजबूत करत आहे. यामुळे भारत सेंद्रिय शेतीमध्ये जगात आघाडीवर राहू शकतो.'' तज्ज्ञांचे म्हणणे आहे की पतंजलीचे मॉडेल शेतीचे भविष्य बदलेल, जे येणाऱ्या पिढ्यांना निरोगी वातावरण आणि समृद्ध शेती देईल.'' पतंजलीचा हा प्रयत्न शेती बदलत आहे आणि पर्यावरणाचे रक्षणही करत आहे. कंपनीच्या योजनांमधून शेतकऱ्यांना आर्थिक फायदा मिळत आहे आणि त्यांच्या सामाजिक जबाबदाऱ्याही पूर्ण होत आहेत. अशा प्रकारे, पतंजलीच्या नवीन पद्धती आणि निष्पक्ष व्यापार भारतीय शेतीला नवीन उंचीवर घेऊन जात आहेत.

# कारले लागवड करण्यासाठी उपयुक्त वाण

कारले हे वेलवर्गीय पीक आहे. साधारण १०० ते १२० दिवसात पीक निघते. कारल्यामध्ये नर व मादी फुले वेगवेगळी परंतु एकाच झाडावर लागतात. स्थानिक बाजारपेठेत पांढऱ्या रंगाची तर निर्यातीसाठी हिरव्या रंगाची कारलेला भरपूर मागणी असते.

मार्केट मधील टॉप कारले बियाणे : अ) विद्यापीठाच्या जाती – १) हिरकणी –फळे गडद हिरव्या रंगाची, १५ ते २० सेंमी. लांब व काटेरी असतात. सरासरी उत्पादन १३० क्विंटल प्रति हेक्टर एवढे मिळते. २) फुले ग्रीन गोल्ड –फळे गडद हिरव्या रंगाची, २५ ते ३० सेंमी. लांब व काटेरी असतात. हेक्टरी २३० क्विंटल उत्पादन मिळते. ३) फुले प्रियांका – या संकरित जातींची फळे गर्द हिरवी, २० सेमी.

लांब व भरपूर काटेरी असतात. ही जात खरीप व उन्हाळी लागवडीस योग्य आहे. ही जात केवडा या रोगास बळी पडत नाही. सरासरी उत्पादन २०० क्विंटल प्रति हेक्टरी आहे. ४) कोकण तारा – फळे हिरवी, काटेरी व १५ सेमी. लांबीची असतात. फळे दोन्ही टोकाला निमुळती व मध्यभागी फुगीर असतात. निर्यातीसाठी अशी फळे योग्य असतात. सरासरी उत्पादन १५ ते २० टन प्रति हेक्टर आहे. कोकण विभागात या जातीच्या लागवडीची शिफारस आहे.

ब) खाजगी कंपनीचे बियाणे : १) महिको व्हाईट लाँग – लागवडीपासून ७५ ते ७८ दिवसात पीक काढणीस तयार होते. फळाचा रंग पांढरा, साल मध्यम जाड व भरपूर शिरा असून फळांची लांबी ९ ते १२ इंच असते. २) महिको ग्रीन लाँग – फळांचा रंग गडद हिरवा व टोकाकडे फिकट असून इतर वैशिष्ट्ये महिको व्हाईट लाँग प्रमाणेच आहेत. ३) एमबीटीएच. १०१ – ५० ते ५५ दिवसात पीक तयार होते. फळाचे सरासरी वजन ६५ ते ७० ग्रॅम असून फळांची लांबी १८ ते २० सें.मी. असते. फळे गडद हिरव्या रंगाची, चांगल्या शिरा असलेली जात आहे. एकरी १० ते १२ टन उत्पादन मिळते. ४) एमबीटीएच १०२ – ५५ ते ६० दिवसात पीक तयार होते. फळाचे सरासरी वजन १०० ते १२० ग्रॅम भरते. फळांचा रंग पांढरा असून फळे ३० ते ३५ सें.मी. लांब व बारीक असतात. एकरी १२ ते १४ टन उत्पादन मिळते.



# जाणून घ्या हायड्रोपोनिक चारा आणि त्याचे फायदे



शेतकरी दूध विक्रीतून मिळणाऱ्या पैशातून कुटुंबाची आर्थिक गरज भागवतात.

मात्र, गेल्या काही दिवसांपासून शेतीचं क्षेत्र कमी होत असल्याचे समोर आले आहे. शेतकऱ्यांसमोर चाऱ्याची समस्या मोठ्या प्रमाणावर निर्माण होत आहे. चाऱ्याच्या समस्येवर मार्ग काढण्यासाठी शेतकऱ्यासमोर हायड्रोपोनिक्स तंत्रज्ञानाचा वापर करुन चारा उपलब्ध करण्याचा मार्ग उपलब्ध झाला आहे. शेतकरी हायड्रोपोनिक्स तंत्रज्ञानाद्वारे १० दिवसांमध्ये चारा तयार करु शकतात. मक्याच्या बियांपासून फक्त हायड्रोपोनिक चारा ट्रे मध्ये पाणी शिंपडून चारा पिकवता येतो. या तंत्राचा वापर करून चारा तयार करण्यासाठी खूप कमी वेळ लागतो. हायड्रोपोनिक्स तंत्राद्वारे शेतकरी बांधवांना फक्त १० दिवसात चारा मिळू शकतो. हायड्रोपोनिक तंत्रज्ञानाचा वापर करून शेती करणे खूप महाग आहे, कारण त्यात खूप खर्च होतो.

१०. मात्र, स्थानिक बाजारपेठेत किंवा घरी उपलब्ध होणाऱ्या वस्तू आणि साधनं वापरून कमी खर्चात चारा पिकवता येऊ शकतो.

हायड्रोपोनिक चाऱ्याचे फायदे : हायड्रोपोनिक्स चाऱ्यामध्ये पारंपारिक चारा कोरडे अन्न किंवा धान्यापेक्षा जास्त पोषक असतो. त्यात उच्च कार्बोहायड्रेट, खनिजे आणि जीवनसत्त्वे असतात. पारंपारिक चाऱ्याच्या वाढवण्यासाठी अनेकदा दोन महिने लागतात, पण तुम्ही फक्त एका आठवड्यात हायड्रोपोनिक चारा वाढवू शकता. पारंपरिक चारा उत्पादनाच्या तुलनेत हायड्रोपोनिक चारा उत्पादनासाठी कमी पाणी लागते. एक किलो हायड्रोपोनिक चारा पिकवण्यासाठी फक्त ३ ते ४ लिटर पाणी आवश्यक आहे; दुसरीकडे, पारंपारिक चाऱ्यासाठी अंदाजे ७०–१०० लिटर पाणी लागते. कमी पाण्याची समस्या असतानाही हायड्रोपोनिक चारा वर्षभर नियमितपणे तयार करता येतो. हायड्रोपोनिक चारा पिकवण्यासाठी कोणत्याही रसायनांची किंवा कीटकनाशकांची गरज नसते. जनावरांच्या शरीरात प्रथिने, खनिजे, जीवनसत्त्वाच्या उपलब्धतेत वाढ होते. प्रथिने, जीवनसत्त्वे, फॉलिक ॲसिड, ओमेगा–३, स्निग्ध पदार्थ हरितद्रव्य मोठ्या प्रमाणात असतात. पशुखाद्याचा खर्च ४० टक्के कमी होतो. जनावरांच्या रोगप्रतिकारक शक्तीत वाढ होते. दुधाच्या फॅट मध्ये वाढ होते. किमान अर्धा लिटर दुधात वाढ होते. जनावरांची प्रजनन क्षमता सक्षम होते.

प्रति किलो हायड्रोपोनिक्स चार्यामधील घटक : १. कॅल्शियम– ०.११ %, २. विटामीन – २५.०१ %, ३. विटामीन – ४५.०१ %, ४. विटामीन – २६.०३%, ५. प्रथिने– १३ ते २० % ६. रायझेस्टिक फायबर– ८०.९२

# सोयाबीनवरील खोड कीड व पाने गुंडाळणाऱ्या अळीचे नियंत्रण!

ज्या भागात सोयाबीनची पेरणी जून महिन्यात झाली तेथे सोयाबीन पीक रोप अवस्थेत असून दोन ते तीन आठवड्यांचे झालेले आहे. कोरड्या वातावरणामुळे सोयाबीन पिकावर खोड माशी व पाने गुंडाळणारी अळी या किडींचा प्रादुर्भाव दिसून येत आहे. प्रादुर्भावाच्या प्राथमिक अवस्थेत या किडींचे व्यवस्थापन करणे हे सुदृढ पीक वाढीसाठी व त्यापासून चांगले उत्पादन मिळवण्यासाठी आवश्यक असते. या किडींचे शास्त्रोक्त पद्धतीने नियंत्रण व व्यवस्थापन करण्याविषयी माहिती पुढील प्रमाणे देण्यात आली आहे.

सोयाबीन पिकावरील किडीचे नियंत्रण उपाय : खोडमाशी – उगवणीपासून ७ ते १० दिवसापर्यंत या किडीचा प्रादुर्भाव पिकावर दिसून येतो, त्यामुळे प्रादुर्भावग्रस्त रोपे पिवळी पडून सुकतात व मरून जातात. झाड पोखरल्यामुळे अन्नद्रव्याचा पुरवठा कमी होऊन पाने पिवळी पडून त्यावर लालसर काळे ठिपके दिसू लागतात, तसेच पानाचा अर्धा भाग सुकून वरच्या बाजूस मुरडला जातो व रोपे वाळून मरून जातात. परिणामी शेतातील रोपांची संख्या कमी होते व उत्पादनात घट येते. पिकाच्या वाढीच्या नंतरच्या अवस्थेमध्ये खोडमाशीचा प्रादुर्भाव झाल्यास रोपे सुकत नाहीत परंतू, खोड पोखरल्यामुळे शेंगांची संख्या व सोयाबीनच्या बियांचे वजन कमी



होते तसेच काही शेंगांमध्ये दाणे भरले जात नाहीत.

खोडमाशी नियंत्रण/व्यवस्थापन : १० ते १५% प्रादुर्भावग्रस्त झाडे, या आर्थिक नुकसान पातळीवर नियंत्रणात्मक उपाययोजना करावी. सोयाबीनची पेरणी वेळेवर म्हणजे जून महिन्यात योग्य वाफस्यावर केल्यास या किडीचा प्रादुर्भाव कमी प्रमाणात दिसून येतो. किडीस प्रतिकारक्षम वाणांची निवड करावी. पेरणीच्या वेळी थायमेथोक्झाम (३० ) १० मिलिची प्रति एक किलो बियाण्यास बीज प्रक्रिया करावी. पीक ७–१० दिवसांचे असताना किडीच्या प्रादुर्भावाची लक्षणे दिसताच थायमेथोक्झाम २५% ७५ ग्रॅम प्रति हेक्टर किंवा थायमेथोक्झाम १२.६०% + लॅम्बडा–सायहॅलोथ्रिन ९.५०% झेड.सी. १२५ मिलि प्रति हेक्टर ५०० लिटर पाण्यामध्ये मिसळून पिकावर फवारावे.

पाने गुंडाळणारी अळी : या किडीच्या अळ्या सुरवातीला पाने पोखरून त्यावर उपजीविका करतात, नंतर ही कीड एक किंवा अधिक पाने एकमेकांस जोडून पानाच्या सुरळीत राहून त्यातील हरितद्रव्यावर जगते. प्रादुर्भावीत झालेली काही पाने गळून पडतात.

पाने गुंडाळणारी अळीचे नियंत्रण/व्यवस्थापन : किडीच्या प्रादुर्भावाच्या सुरुवातीच्या कालावधीत गुंडाळलेली किंवा सुरळी झालेली पाने तोडून घेऊन शेताबाहेर जमिनीत पुरून टाकावीत किंवा योग्य उपाययोजना करून अळ्यांचा नायनाट करावा. या किडीचा प्रादुर्भाव झाल्यास पिकावर क्विनॉलफॉस २५ इ.सी. १.५ लिटर प्रति हेक्टर किंवा प्रोफेनोफॉस १ लिटर प्रति हेक्टर किंवा इंडोक्झाकार्ब १४.५ एस.सी. ५०० मि.ली. प्रति हेक्टर किंवा क्लोरांट्रॅनीलिप्रोल १८.५ एस.सी. १५० मि.ली. प्रति हेक्टर यापैकी एका कीटकनाशकाची आलटून पालटून ५०० लिट्र पाण्यात मिसळून फवारणी करावी.

## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१६६२ : इंग्लंडमधे प्रतिष्ठित असलेल्या 'रॉयल सोसायटी'ची स्थापना
१६७४ : मुघल सरदार बहादुरशाह कोकलताश याच्या ताब्यात असलेल्या पेडगावची मराठ्यांनी लूट केली. सुमारे १ कोटिची लूट रायगडावर जमा झाली.
१९१६ : जगभरात विमान, रोटरक्राफ्ट, रॉकेट, उपग्रह, दूरसंचार उपकरणे आणि क्षेपणास्त्रांची रचना आणि विक्री करणारी अमेरिकन बहुराष्ट्रीय कंपनी बोईंग ची स्थापना करण्यात आली.
१९२६ : मुंबईत कुलाबा ते क्रॉफर्ड मार्केट अशी उपनगरी बस सेवा सुरू झाली.
१९२७ : समाजाला कुटुंबनियोजन आणि लैंगिक समस्यांसंबधी मार्गदर्शन करण्याच्या उद्देशाने र. धों. कर्वे यांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत सुरु केलेल्या 'समाजस्वास्थ्य' या मासिकाचा पहिला अंक प्रकाशित झाला.
१९५५ : आण्विक अस्त्रांवर बंदी घालणाऱ्या मैनाउ जाहीरनाम्यावर १८ नोबेल पारितोषिक विजेत्या शास्त्रज्ञांनी स्वाक्षऱ्या केल्या. नंतर आणखी ३८ नोबेल पारितोषिक विजेत्यांनी त्याला मान्यता दिली.
१९५५ : पंडित जवाहरलाल नेहरू यांना 'भारतरत्न' हा सर्वोच्च नागरी सन्मान जाहीर
१९६२ : शिक्षणक्षेत्रातील महत्त्वपूर्ण व यशस्वी प्रयोग मानल्या जाणार्या 'ज्ञानप्रबोधिनी' या संस्थेचा पुणे येथे प्रारंभ
१९७९ : भारताचे तत्कालीन पंतप्रधान मोरारजी देसाई यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला.
१९९६ : स्वाध्याय परिवाराचे प्रणेते पांडुरंगशास्त्री आठवले यांना रॅमन मॅगसेसे पुरस्कार जाहीर
१९९७ : पर्यावरणवादी कार्यकर्ते महेशचंद्र मेहता यांची रॅमन मॅगसेसे पुरस्कारासाठी निवड
२००६ : ट्विटर हा सर्वात मोठा सोशिअल प्लॅटफॉर्म सुरु झाला.
२०११ : भारतीय अंतराळ संस्था इस्रो ने आपल्या ध्रुवीय उपग्रह प्रक्षेपण वाहन पीएसएलव्हीद्वारे आधुनिक संप्रेषण उपग्रह जीसॅट–१२ अंतराळ कक्षेत यशस्वीरित्या स्थापित केला.
२०१४ : जागतिक युवा कौशल्य दिन

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१६०६ : रेंब्राँ डच चित्रकार (मृत्यू: ४ आक्टोबर १६६९)
१६११ : मिर्झा राजे जयसिंग (मृत्यू: २८ ऑगस्ट १६६७)
१७८३ : पर्शियन भारतीय व्यापारी व दानवीर जमशेदजी जीजाभाई यांचा जन्मदिन.
१८४० : स्कॉटिश इतिहासकार, सांखिकीतज्ञ, संकलक आणि भारतीय नागरी सेवेचा सदस्य विलियम विलसन हन्टर यांचा जन्मदिन.
१९०३ : के. कामराज स्वातंत्र्यसैनिक, खासदार व तामिळनाडुचे मुख्यमंत्री (मृत्यू: २ आक्टोबर १९७५)
१९०४ : गानतपस्विनी मोगुबाई कुर्डीकर जयपूर अत्रौली घराण्याच्या शास्त्रीय गायिका (मृत्यू: १० फेब्रुवारी २००१)
१९०५ : चौधरी मुहम्मद अली पाकिस्तानचे ४ थे पंतप्रधान (मृत्यू: २ डिसेंबर १९८०)
१९०९ : भारतीय स्वतंत्रता सेनानी, मुत्सदी, वकील व आंध्रप्रदेश राज्याच्या पहिल्या महिला राजनेता दुर्गाबाई देशमुख यांचा जन्मदिन.
१९१७ : नूर मोहम्मद तराकी अफगणिस्तानचे तिसरे राष्ट्राध्यक्ष (मृत्यू: १४ सप्टेंबर १९७९)
१९२७ : प्रा. शिवाजीराव भोसले विचारवंत, वक्ते व डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू (मृत्यू: २९ जून २०१०)
१९३० : नोबल पारितोषिक विजेता अमेरिकन भौतिकशास्त्रज्ञ लिओन एम. लेडर मैन यांचा जन्मदिन.
१९३२ : नरहर कुरुंदकर विद्वान, टीकाकार आणि लेखक (मृत्यू: १० फेब्रुवारी १९८२)
१९३३ : भारतीय लेखक आणि पटकथालेखक एम. टी. वासुदेवन नायर यांचा जन्म.
१९३६ : भारतीय हिंदी पत्रकारिता, लेखक आणि राजकीय विश्लेषक प्रभास जोशी यांचा जन्मदिन.
१९३७ : भारतीय पत्रकार श्री प्रभाज जोशी यांचा जन्म. (मृत्यू: ५ नोव्हेंबर २००९)
१९४९ : माधव कोंडविलकर दलित साहित्यिक

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१२९१ : रुडॉल्फ (पहिला) जर्मनीचा राजा (जन्म: १ मे १२१८)
१५४२ : लिओनार्डो दा विंची यांच्या पेंटिंग मोना लिसा मधील महिला लिसा डेल जिकॉन्डो यांचे निधन. (जन्म: १५ जून १४७९)
१९०४ : अंतॉन चेकॉव्ह रशियन कथाकार व नाटककार. याने मॉस्को विद्यापीठातून वैद्यकीय पदवी घेतली होती मात्र वैद्यकीय व्यवसाय कधी केला नाही. (जन्म: २९ जानेवारी १८६०)
१९१९ : एमिल फिशर रासायनिक प्रक्रियेद्वारे शर्करा रेणूंच्या निर्मितीसाठी १९०२ मध्ये नोबेल पुरस्कार मिळालेले जर्मन रसायनशास्त्रज्ञ (जन्म: ९ आक्टोबर १८५२)
१९५३ : ऑर्डर ऑफ दी इमिटेशन ऑफ क्राइस्ट चे संस्थापक भारतीय आर्चबिशप गिवरगीस मार इव्हानिओस यांचे निधन. (जन्म: २१ सप्टेंबर १८८२)
१९६७ : नारायण श्रीपाद राजहंस तथा 'बालगंधर्व' गायक व नट (जन्म: २६ जून १८८८)
१९७९ : मेक्सिकोचे राष्ट्राध्यक्ष गुस्तावोदियाझ ओर्दाझ यांचे निधन.
१९९१ : जगन्नाथराव जोशी जनसंघ व भाजपचे नेते, गोवा मुक्तिसंग्रामातील स्वातंत्र्यसैनिक, संसदपटू, वक्ते (जन्म: ? ? १९२०)
१९९८ : ताराचंद परमार गांधीवादी कार्यकर्ते व स्वातंत्र्यसैनिक
१९९९ : इंदुताई टिळक सामाजिक कार्यकर्त्या
१९९९ : जगदीश गोडबोले पर्यावरणवादी लेखक व सामाजिक कार्यकर्ते
२००४ : डॉ. बानू कोयाजी कुटुंबनियोजनाच्या क्षेत्रात सलग साठ वर्षे कार्य करणार्या सामाजिक कार्यकर्त्या. त्यांना पद्मभूषण, रॅमन मॅगसेसे पुरस्कार, रामेश्वरदास बिर्ला राष्ट्रीय पुरस्कार, पुण्यभूषण पुरस्कार, पुणे विद्यापीठातर्फे डॉक्टर ऑफ लेटर्स (१९५५) इ. पुरस्कारांनी गौरविण्यात आले. पुण्यातील के. इ. एम. रुग्णालय, जहांगीर नर्सिंग होम, दैनिक सकाळ, इंडिया फांउडेशन इ.संस्थांशी त्यांचा निकटचा संबंध होता. (जन्म: २२ ऑगस्ट १९१८)

# ५३ धोकादायक बनलेल्या जिल्हा परिषद शाळांकडे प्रशासनाचे दुर्लक्ष

## दुरुस्ती, नूतनीकराचा प्रस्ताव जिल्हा परिषद प्रशासनाकडे धुळखात पडून

माजलगाव। प्रतिनिधी

माजलगाव तालुक्यातील १४ शाळांना इमारत नाही माजलगाव तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या २७७ शाळांपैकी ५३ शाळांच्या इमारतीची पडझड झाल्याने धोकादायक बनल्या आहेत. तर १४ शाळांना पक्की इमारत नसल्याने पत्र्याच्या शेडमध्ये शाळा भरावी लागत आहे. या संदर्भात ग्रामस्थांनी जिल्हा परिषद प्रशासन व शासनाकडे शाळा इमारत बांधकामासाठी निधीची मागणी केली आहे. त्याच प्रमाणे स्थानिक प्रशासनाने दुरुस्ती व नूतनीकरणाचा अहवाल जिल्हा परिषद प्रशासनाकडे पाठवला आहे. परंतु सर्व अहवाल प्रशासनाकडे धुळखात पडून आहेत. येत्या सोमवारपासून उन्हाळी सुट्यानंतर शाळा पुन्हा सुरु होणार आहेत. परंतु ५३ शाळांमधील विद्यार्थ्यांना इमरात दुरुस्ती अभावी गळती होणाऱ्या व पडझड झालेल्या वर्गखोल्यांमध्येच शिक्षण घ्यावे लागणार आहे.



शासनस्तरावरून शिक्षण व आरोग्य व स्वच्छतेसाठी मोठा निधी दिला जातो. दरवर्षी शिक्षण विभाग शाळेतील विद्यार्थी गळतीचे प्रमाण थांबवण्यासाठी मोफत पाठ्यपुस्तके, गणवेश वाटप, शालेय पोषण आहार या सारख्या योजना राबवते. याही वर्षी शाळेच्या पहिल्याच दिवशी पुस्तके मिळणार असल्याचे शिक्षण विभाग सांगत आहे. परंतु शाळेच्या वर्ग खोल्यांना पडलेले छिद्र, भिंतींना पडलेल्या भेगा त्याच प्रमाणे शाळा परिसराची दुरुस्तीअभावी झालेली दुरावस्था ही मात्र कोणीही पाहण्यास तयार नाही. यामुळे यंदाही माजलगाव तालुक्यातील मोडकळीस येवून धोकादायक बनलेल्या ५३ शाळांमधील विद्यार्थ्यांना भर पावसाळ्यात गळक्या वर्गखोल्यांमध्ये शिक्षण घ्यावे लागणार आहे. स्थानिक प्रशासनाने वरिष्ठांना शाळेच्या दुरुस्ती संदर्भात अहवाल पाठविलेला आहे. परंतु तरी देखील प्रशासनाने शाळांच्या इमारत दुरुस्तीकडे दुर्लक्ष केले. ही बाब अत्यंत संतापजनक आहे. प्रशासनाच्या या दुर्लक्षीतपणाबद्दल ग्रामस्थांमध्ये प्रचंड असंतोष निर्माण झालेला असून येत्या काळात प्रशासनाचे लक्ष धोकादायक शाळा इमारतींकडे वळवण्यासाठी जिल्हा परिषद मुख्यालयातच शाळा भरवण्याचा मार्ग अवलंबवावा लागेल अशी संतप्त भावना पालकांमधून व्यक्त होत आहे.

१४ शाळांना तर अद्यापही आहे इमारतीची प्रतिक्षा जिल्हा परिषदेच्या शाळा वाचवण्यासाठी जरी प्रयत्न सुरू असले तरी मात्र तालुक्यातील हनुमाननगर तांडा, राठोड वस्ती पवारवाडी कारखाना, येळा तांडा तालखेड, इंदिरानगर राजेगाव, माउली वसाहत शु. लिमगाव, झोपडपट्टी वारोळा, नागडगाव तांडा, हनुमान नगर टाकरवण, माजलगाव नं. १ शाळासह एकुण १४ शाळांना इमारत नसल्याने मात्र विद्यार्थ्यांना उघड्यावर, झाडाखाली, मंदिरात, सभागृहात तसेच उघड्यावर विद्यार्थ्यांना ज्ञानार्जन करण्याचे काम शिक्षकांना करावे लागते.

वरिष्ठ कार्यालयास नादुरुस्त धोकादायक इमारतीबद्दल माहिती कळवलेली आहे. वरिष्ठ पातळीवर आणखी काही उपाययोजना झालेल्या नाहीत. शाळांची दुरावस्था झालेली असताना देखील शिक्षकांना अध्यापन कार्य अशा इमारतींमध्ये करावे लागत आहे. यामुळे विद्यार्थी व शिक्षक त्रस्त असुन पावसाळ्यात शाळा नेमकी भरवणार कशी असाही प्रश्न पडला. त्यासाठी वरिष्ठ पातळीवरून उपाययोजना होण्याची अपेक्षा आहे.

# बच्चु कडु यांच्या अन्नत्याग आंदोलनाला लिंबागणेशकरांचा पाठिंबा



लिंबागणेश । प्रतिनिधी

शेतकऱ्यांना संपुर्ण कर्जमाफीसह , शेतीमालाला हमीभाव, शेतमजूर,दिव्यांग, ग्रामपंचायत कर्मचारी, विविध प्रश्नासंदर्भात प्रहार संघटनेचे अध्यक्ष बच्चु भाऊ कडु यांचे राष्ट्रसंतांच्या महासमाधीपुढे गुरूकुंज मोझरी येथे गेल्या ७ दिवसांपासून बेमुदत अन्नत्याग आंदोलन सुरू असुन बच्चु कडु यांनी उपस्थित केलेले प्रश्न हे कटु सत्य असुन शेतमालाला भाव नाही, राज्यात शेतकरी आत्महत्या मोठ्या प्रमाणात होत आहेत.

सत्ताधा-यांनी निवडणुकीत दिलेले कर्जमाफीचे आश्वासन पाळले नाही.आर्थिक संकटात सापडलेला शेतकरी हताश होऊन टोकाचे पाऊल उचलुन आपले जीवन संपवत आहे. अवकाळी झालेल्या पावसामुळे झालेल्या नुकसानीची भरपाई शेतकऱ्यांना मिळत नाही.जगाचा पोशिंदा बळीराजा आर्थिक संकटात सापडला आहे. त्यामुळे मा.बच्चु भाऊ कडु यांच्या समर्थनार्थ आज दि.१४ शनिवार रोजी सकाळी लिंबागणेशकरांनी मुख्य प्रवेशद्वार याठिकाणी बच्चु भाऊ कडु यांच्या समर्थनार्थ व शेतकऱ्यांची कर्जमाफी झालीच पाहिजे '' शेतीमालाला हमीभाव मिळालाच पाहिजे, सरकारचे धोरण हेच शेतकऱ्यांचे मरण'' अशी घोषणाबाजी करत निदर्शने करण्यात आली. शेतकरी कर्जमाफीसह प्रमुख मागणीसह ईतर मागण्या मान्य करून बच्चु भाऊ कडु यांच्या जिवीतास धोका असुन परिस्थिती चिघळण्या अगोदरच बेमुदत आमरण उपोषण सोडवण्याची मागणी करत बच्चु भाऊ कडु यांना ईमेल द्वारे आपला पाठिंबा दर्शविला आहे. निवेदन जिल्हाधिकारी बीड यांच्या मार्फत मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांना पाठवले आहे.यावेळी राजेभाऊ गिरे, भिम टायगर ग्रुपचे बीड जिल्हाध्यक्ष रविंद्र निर्मळ, उपसरपंच बाळकृष्ण थोरात, ऑल इंडिया पँथर सेनेचे बीड जिल्हाध्यक्ष नितिन सोनावणे, विक्रांत वाणी, रामकिसन गिरे, संतोष भोसले, सय्यद अख्तर, सुरेश निर्मळ,आरूण निर्मळ, राहुल जाधव, तुकाराम गायकवाड, रामदास मुळे, अर्जुन गोंडे,आश्रुबा गिरे, भगवान मोरे, रामकिसन गिरे,लहु घोलप, दत्ता घरत, तुषार गायकवाड,शहाजी वाणी, भालचंद्र गिरे,लहु घोलप आदी सहभागी होते.

# पाटोद्यात उपविभागीय अधिकाऱ्यास खासगी वाहने भाड्याने घ्यावे लागते

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा प्रशासनाचा कणा समजल्या जाणाऱ्या महसूल विभागात कर्मचारी आणि वाहनाची कमतरता आहे उपविभागीय अधिकाऱ्यांचे वाहन दुरुस्ती अभावी पडून असल्याने उपविभागीय अधिकारीस खाजगी वाहने किरायाने घ्यावे लागत आहे महसुली विभाग आणि तहसील कार्यालयामध्ये शासन नियुक्त कर्मचारी अपुरे असल्याने खाजगी कंत्राटी बेजबाबदार लोकांना महत्त्वाच्या टेबलाचे काम देण्यात येत आहे. असे चित्र आहे अशा स्थितीत ट्रिपल इंजन सरकारचा गिअर फसत असल्याने कामास वेग कसा येणार असा प्रश्न निर्माण झाला आहे महसूल विभाग राज्य शासनाचा कणा समजला जातो महसूल विभागाचे कामकाज अगदी वाडी वस्ती ते थेट मंत्रालयापर्यंत जबाबदारीचे आहे असे असताना हा कणाच खेळ खेळा असल्याचे चित्र पाटोदा तहसील उपविभागीय कार्यालयामध्ये दिसून आले आहे पाटोदा येथील उपविभागीय अधिकारी कार्यालयास देण्यात आलेले वाहन मागील अनेक दिवसापासून नादुरुस्त आहे उपविभागीय अधिकारी वसीमा शेख या खाजगी गाडीतून प्रशासकीय कामकाज करत आहे उपविभागीय कार्यालयात कर्मचाऱ्यांची वनवा आहे खाजगी कंत्राटी कर्मचाऱ्याकडे महत्त्वाच्या कामाचे टेबल असल्याने चुकीचे कामकाज हातातून गेल्यास जबाबदार कोण असा प्रश्न निर्माण होऊ शकतो. तालुका प्रशासनाचे बॉस असलेल्या तहसील कार्यालयाची ही अवस्था बिकट आहे तहसीलदारचे वाहन १२ वर्षांपूर्वीचे आहे वाहन चालकासह कार्यालयात कर्मचाऱ्यांची तुटवडा आहे तहसीलमध्ये ही खाजगी कंत्राटी वेब जबाबदार कर्मचारी टेबलावर बसवल्याने तहसीलचा कारभार हे पाळलेला आहे तहसीलचे वाहन बहुतांश वेळा कोतवालाच्या हाती असते तर उपविभागीय अधिकाऱ्यांचे वाहन खाजगी चालकाच्या हाती असते




# ना. पंकजा मुंडे यांचे देशी गोवंश संवर्धनासाठी महत्त्वपूर्ण पाऊल

## २२ जुलै हा दिवस ''शुद्ध देशी गोवंश जतन व संवर्धन दिन'' म्हणून साजरा होणार

मुंबई । प्रतिनिधी

राज्याच्या पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी देशी गायींच्या संवर्धनासाठी एक महत्त्वपूर्ण निर्णय घेतला असून, दरवर्षी २२ जुलै हा दिवस ''शुद्ध देशी गोवंश जतन आणि संवर्धन दिन'' म्हणून साजरा करण्याचा निर्णय घेतला आहे. या निर्णयाचा अध्यादेश सरकारने निर्गमित केला आहे. यापूर्वीच देशी गायीस ''राज्यमातागोमाता'' म्हणून घोषित करण्यात आले असून, या पार्श्वभूमीवर हा निर्णय घेण्यात आला आहे.



राज्यात मराठवाडा विभागात देवणी, लालकंधारी. पश्चिम महाराष्ट्रामध्ये खिल्लार, उत्तर महाराष्ट्रात डांगी तर विदर्भात गवळाऊ यांसारख्या देशी गायींच्या जाती आढळतात. मात्र, कमी उत्पादनक्षमता व प्रजननक्षमतेमुळे या गायींच्या संख्येत सातत्याने घट होत चालली आहे. यामुळे त्यांचे जतन व संवर्धन करण्याची गरज निर्माण झाली आहे.या पार्श्वभूमीवर, देशी गायींचे जतन व संवर्धन करण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाच्या मदतीने त्यांच्या गुणवत्तेमध्ये वाढ करून अधिक उत्पादनक्षम देशी गायी तयार करण्याचे उद्दिष्ट शासनाने घेतले आहे. यासोबतच देशी गायींच्या दुधाचे, शेणाचे, गोमुत्राचे उत्पादन व विपणन यासाठी बाजारपेठ उपलब्ध करून देण्यावर भर दिला जाणार आहे.

''शुद्ध देशी गोवंश जतन आणि संवर्धन दिन'' साजरा करताना चर्चासत्रे, शिबिरे, प्रदर्शने व विविध स्पर्धा यांचा समावेश असलेल्या कार्यक्रमांचे आयोजन केले जाईल. राज्य शासनाच्या आयुक्त, पशुसंवर्धन विभाग व महाराष्ट्र गोसेवा आयोगाच्या संयुक्त विद्यमाने या दिवसाचे आयोजन करण्यात येणार असून, यासाठी लागणारा खर्च गोसेवा आयोगाच्या निधीतून करण्यात येणार आहे.राज्यातील देशी गोवंशाच्या जतनासाठी व लोकजागृतीसाठी शासनाने घेतलेला हा निर्णय स्वागतार्ह ठरत असून, स्थानिक देशी गायांच्या संवर्धनासाठी एक सकारात्मक पाऊल असल्याचे पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांनी सांगितले.

## किरण थोरवे याची एसबीआय बँकेच्या क्लार्कपदी निवड

पिंपळवंडी । प्रतिनिधी



येथून जवळच असलेल्या पाटोदा तालुक्यातील भराटवाडी येथील शेतकरी राम महादेव थोरवे यांचा मुलगा किरण राम थोरवे याने स्टेट बँक ऑफ इंडिया मार्फत घेतलेल्या परीक्षेत उत्तीर्ण होऊन घवघवीत यश संपादन केले आहे.तसेच त्याची एसबीआय क्लार्क पदासाठी निवड झाल्याबद्दल त्याचे भराटवाडी,पांगरी व परिसरातून कौतुक केले जात आहे. चि.किरण हा शाळेत हुशार विद्यार्थी होता.अभ्यासात चिकाटी व जिद्द हा उद्देश समोर ठेवून त्यांनी एसबीआय बँक परीक्षेत यश संपादन केले आहे. खेड्यातील व शेतकऱ्यांची मुले सुद्धा शिक्षणात मागे नाहीत हे किरणने दाखवून दिले आहे.आज सुद्धा ग्रामीण व खेडे वाडीतील अनेक विद्यार्थी स्पर्धा परीक्षा उत्तीर्ण होऊन विविध पदावर अधिकारी,पदाधिकारी पदी विराजमान झाले आहेत व होत आहेत.चि.किरण यांच्या यशाबद्दल पांगरी,जाधववाडी येथील सरपंच, उपसरपंच,चेअरमन,ग्रा.पं.सदस्य व ग्रामस्थांनी अभिनंदन केले आहे.

# तलाठी व मंडळ अधिकारी सजावर नसल्यामुळे शेतकऱ्यांचे हाल

पाटोदा । प्रतिनिधी

सध्या तालुक्यामध्ये पावसामुळे शेतकऱ्याचे शेतातील पिकासह फळबागाचे मोठे प्रमाणात नुकसान झाले असून मात्र या नैसर्गिक आपत्तीच्या काळात तालुक्यात तलाठी व मंडळ अधिकारी हे सजा वर नसल्यामुळे शेतकऱ्याला मोठ्या प्रमाणात संकटाला तोंड द्यावे लागत असून तरी याची उपविभागीय अधिकारी पाटोदा व तहसीलदार पाटोदा यांनी चौकशी करून मुख्यालय न राहणाऱ्यावर कारवाई करावी अशी मागणी शेतकऱ्यातुन होत आहे.

तालुक्यामध्ये सध्या मे महिन्यापासून बऱ्यापैकी बहुतांशी भागात मोठ्या प्रमाणात पाऊस झाला असून अनेक ठिकाणी पेरण्या चालू आहे तर काही ठिकाणी संपत आल्या आहेत तसेच कांदा फळबाग सह आदी पिकाचे या वादळी पावसामुळे मोठ्या प्रमाणात नुकसान होत असून मात्र तालुक्यातील असणारे तलाठी व मंडळ अधिकारी हे नैसर्गिक आपत्तीच्या काळात सजा वर नसल्यामुळे शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणात अडचण निर्माण होत असून तलाठी आणि मंडळ अधिकारी सापडायचे म्हणल्यानंतर तालुक्याला यावे लागत आहे. मात्र तालुक्यातही नसल्यामुळे नेमके हे सजा वर ही नाहीत आणि तालुक्यातील नाहीत नेमके कोठे आहेत यामुळे मात्र शेतकरी मोठा अडचणी सापडला असून तरी याकडे तात्काळ उपविभागीय अधिकारी पाटोदा व तहसीलदार पाटोदा यांनी लक्ष देऊन सजा वर न राहणाऱ्या तलाठी व मंडळ अधिकारी यांच्यावर कडक कारवाई करावी अशी मागणी शेतकरी वर्गातून होत आहे

## रक्तदान करुन जागतिक रक्तदान दिन साजरा



अंबड । प्रतिनिधी

जागतिक रक्तदान दिनानिमित्त अंबड शहरातील २५ ते ४० वयोगटातील तरुणांनी अंबड येथे उर्दू स्कुल येथे आयोजित रक्तदान शिबीरात विठ्ठल शेटे, संतोष वाघ,राहुल बांडे, जहीर कुरेशी, सद्दाम कुरेशी, आरेश शेख, जाकेर शेख, शहबाज शेख, रईस कुरेशी, समीर शेख, शेख शाकेर, अफरोज पठाण, फेरोज शेख, नईम पठाण, सलमान चाऊस, एजाज खतीब सह तब्बल पन्नास रक्तदात्यांनी आज दि.१४ रोजी रक्तदान केले. वरुडी येथील नुर हाँस्पीटलच्या रक्तपेढीचे डाँ.इम्तियाज शेख, डाँ.बुशरा पारेख, डाँ.सभा,करामत खान, जनसंपर्क अधिकारी विवेक मोरे यांचेसह आयोजक इंशा अल्ला ग्रुपचे अन्वर कुरेशी,फारुख टेलर, अजहर तांबोळी, रईस मनियार, जबीर तांबोळी, फय्याज तांबोळी, सय्यद तौफिक,फेरोज खान, अस्लम जहागीरदार, कौसर शहा उपस्थित होते.

## पाटोदा शहरात डासाचे प्रमाण वाढले

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा शहरात सततच्या पावसामुळे घाणीचे साम्राज्य पसरले असून कुठेही आरोग्य विभागामार्फत दूर फवारणी झाली नाही मच्छर डासाचे प्रमाण भरपूर झाले असून मच्छर मुळे डेंगू मलेरिया ताप सर्दी होण्याची शक्यता असून यावर आरोग्य विभाग काही उपाययोजना करताना दिसत नाही तसेच अशा सेविका कुठेही पाणी तपासणी करत नाहीत पाण्यामध्ये घरोघरी जाऊन क्लोरीन टकने बीएससी पावडर कुठेही टाकताना दिसत नाहीत यांच्यावर कोणाचाही नियंत्रण नाही यावर आरोग्य विभाग मूग गिळून गप्पा असून आरोग्य विभाग म्हणजे मला पहा आणि पानफुले वाह असा आहे

# उच्चशिक्षितांचेही लक्ष आता कारंजा टॉवरकडे!

## येथे साजऱ्या होणाऱ्या वाढदिवसांनी या ऐतिहासिक वास्तूची दुरावस्था दूर होणार का -युसूफ़

बीड । प्रतिनिधी

शहराची ओळख असलेल्या ऐतिहासिक कारंजा टॉवर कडे आता उच्चशिक्षितांचेही लक्ष जाऊ लागले आहे. नुकतेच येथे एका अभियंत्याचा वाढदिवस येथे साजरा करण्यात आला. येथे साजऱ्या होणाऱ्या वाढदिवसांनी या ऐतिहासिक वास्तूची दुरावस्था दूर होणार का असा प्रश्न या निमित्ताने मुक्तपत्रकार एस.एम.युसूफ़ यांनी उपस्थित केला आहे.



सन २०१४ सालापासून ऐतिहासिक कारंजा टॉवर ची दुर्दशा दूर करण्यात यावी याकरिता शासन-प्रशासनाकडे सातत्याने पाठपुरावा सुरू आहे. याकरिता वेळोवेळी निवेदने देण्यात आलेली आहेत. प्रसिद्धी माध्यमातून लेख आणि बातम्या सुद्धा प्रकाशित करण्यात आलेल्या आहेत. तरीही जिल्हा प्रशासन असो की बीड नगर परिषद प्रशासन दोघांकडूनही ऐतिहासिक कारंजा टॉवरसाठी गेल्या अकरा वर्षात एकही काम करण्यात आलेले नाही. या ऐतिहासिक इमारतीच्या परिपूर्णतेसाठी आवश्यक असलेली १४ कामे करण्याची यादी जिल्हाधिकारी आणि मुख्याधिकारी यांना देण्यात आलेली आहे. त्यापैकी ०३ कामे कारंजा परिसरातील मिर्झा अब्दुल रऊफ़ बेग यांनी पुढाकार घेत इतरांना सोबत घेऊन केली आहेत. बाकीची ११ कामे अजूनही प्रतीक्षेतच आहेत. म्हणून वेळोवेळी याकडे दोन्ही प्रशासनाचे लक्ष वेधण्यात येत आहे. तरीही जिल्हा प्रशासन आणि बीड नगर परिषद प्रशासन इकडे लक्ष द्यायला तयार नाहीत. मात्र आता समाजातील उच्चशिक्षित लोकांचे लक्ष कारंजा टॉवर कडे जात असून ते टॉवर समोर येऊन आपले वाढदिवस साजरे करू लागले आहेत. अशाच प्रकारे नुकतेच येथे सचिन ठोंबरे या अभियंत्यांचा वाढदिवस दिगंबर माळगे, नवनाथ तपासे, बाबा पंडित, शिवाजी सुस्कर, अंकुश आगळे, गोविंद धांडे, अमोल कुमकर, नितीन धांडे, शंकरराव जगताप, डॉ. विक्रम सिंह कपूर, मुकुंद भालेकर, मधुकर धांडे, ऐतिहासिक कारंजा टॉवर साठी संघर्षरत असलेले ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते तथा उद्योजक रमेशराव गंगाधरे, गणेश तपासे, मन्यारवाडी चे सरपंच भिकू शिंदे, शेख लालू यांच्या उपस्थितीत साजरा करण्यात आला. यामुळे ऐतिहासिक कारंजा टॉवर चा सन्मान करत येथे साजरे करण्यात येणारे वाढदिवस या ऐतिहासिक वास्तूची दूर्दशा दूर करणार का असा प्रश्न मुक्तपत्रकार एस.एम.युसूफ़ यांनी उपस्थित केला आहे.

# सर्दी अन ठसक्यामुळे तालुका फणफणला

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा तालुक्यात सध्या सर्दी पडसे व ठसक्यामुळे तालुका फनफनला असून लहान बालकासह मोठ्यापर्यंत या व्हायरल मुळे परेशानी झाली असून याकडे मात्र ता.आरोग्य यांचे दुर्लक्ष केले जाणवत आहे.काही प्राथमिक आरोग्य केंद्रात डॉक्टर नाहीत तर काही ठिकाणी औषधे नाहीत.तसेच पाणी नमुने तपासावेत सह फवारणी करावी व घरोघर जाऊन कर्मचाऱ्यांनी डास परीसरात होवू नये यासाठी जनजागृती करावी याकडे नुतन मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद बीड यांनी भेट देऊन पाहणी करावी अशी मागणी होत आहे.

याबाबत अधिक माहिती सध्या पाटोदा तालुक्यात सर्दी. पडसे खोकला ठसका या व्हायरल मुळे तालुका फनफनला असून यामुळे मात्र लहान बालकासह मोठ्यापर्यंतचे हाल होत असून तालुका आरोग्य अधिकारी यांच्या दुर्लक्षपणामुळे सर्वसामान्यना खासगी

### तालुका आरोग्य अधिकाऱ्यांचे दुर्लक्ष

रुग्णालयाचा आधार घ्यावा लागत असून प्राथमिक आरोग्य केंद्र गेल्यानंतर कधी डॉक्टर नसतात तर कधी मेडिसिन नसते यामुळे मात्र सर्वसामान्य गोरगरीब हे खाजगी दवाखान्याच्या आधार घेत आहेत.पाणी नमुने सह फवारणी करावी व घरोघर जाऊन कर्मचाऱ्यांनी डास परीसरात होवू नये यासाठी जनजागृती करावी त्याचप्रमाणे पाटोदा शहरातील असणाऱ्या ग्रामीण रुग्णालयातील या व्हायरल मुळे मोठ्या प्रकरणात रुग्णांची संख्या वाढली आहे नेमकं व्हायरल कशामुळे होत आहे याची चौकशी करून याकडे लक्ष नुतन मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद बीड यांनी द्यावे अशी मागणी होत आहे

cmyk

राज्य
# लोकतंत्र

रविवार, दि.१५ जुन २०२५ | ६

# माऊली दादाच्या त्यागाने चाकरवाडीचं पंढरपूर झालं-प.पूज्य प्रदीप मिश्राजी

## अलोट गर्दीत माऊली दादाच्या रौप्यमहोत्सवाची सांगता, चाकरवाडीत महाप्रसादाच्या महापंगती

चाकरवाडी । प्रतिनिधी

जेथे साधू संताचा पवन स्पर्श होतो, तेथील जागेचे सोनं झाल्याशिवाय रहात नाही. संत ज्ञानेश्वर माऊली दादा यांच्या त्यागामुळे चाकरवाडी फक्त चाकरवाडी राहिली नसून ती प्रति पंढरपूर झाली आहे.असे विचार प.पु. प्रदीपजी मिश्रा यांनी शिवपुराण कथेच्या सांगतेला काढले.

विसाव्या शतकातील महान संत सद्गुरु ज्ञानेश्वर माऊली दादा महाराज यांच्या पंचेविसाव्या पुण्यस्मरणार्थ रौप्यमहोत्सवी सोहळयात अखंड हरिनाम सप्ताह व श्री प पूज्य प्रदीप मिश्राजी यांच्या शिव महापुराण कथा आयोजन तपोनिधी शांतीब्रह गुरुवर्य श्री महादेव महाराज तात्या चाकरवाडीकर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले होते. शनिवार (दि.१४) रोजी अखंड हरिनाम सप्ताह व श्री



प पूज्य प्रदीप मिश्राजी यांच्या शिवमहापुराण कथेची सांगता महाप्रसादाच्या महापांगतीने झाली.

प्रदीप मिश्राजी यांनी शिवमहापुराण कथेस समारोप करताना जेथे साधू संताचा पवन स्पर्श होतो, त्या जागेत सोनं झाल्याशिवाय रहात नाही. संत ज्ञानेश्वर माऊली दादा यांच्या त्यागामुळे चाकरवाडी

### माऊली दादा करुणेचा सागर-ह.भ.प. संदीपान महाराज हासेगावकर

फक्त चाकरवाडी राहिली नसून प्रति पंढरपूर झाली आहे. संत संगतीने जीवनचे सोनं होतं, माणसाने संगती चांगली ठेवावी. माशी भाजीपाल्यावर बसवली तर तिची किंमत बदलत नाही, माशी, पेढयावर बसल्यावर तिची किंमत वाढत नाही, परंतु तीच माशी सोनं मोजताना सोन्यावर बसली किंवा हिरा मोजताना हिऱ्यावर बसली तर त्याची किंमत कित्येक पटीने वाढते तसे आपण कोणाच्या संगतीत आहेत हे महत्त्वाचं आहे, त्यामुळे साधू संताच्या संगतीत राहीले तर मनुष्याच्या जीवनचे सोने झाल्याशिवार राहणार नाही.

आज माऊली दादांच्या त्यागामुळे चाकरवाडीच श्री क्षेत्र चाकरवाडी प्रतिपंढरपूर झाले असल्याचे त्यांनी यावेळी सांगीतले. शिव महापुराण कथा सांगता झाल्यानंतर अखंड हरिनाम सप्ताहामध्ये शनिवारी श्री ह. भ. प. संदीपान महाराज हासेगावकर, श्री जोग महाराज वारकरी शिक्षण संस्था श्री क्षेत्र आळंदी देहू यांचे काल्याचे कीर्तन कीर्तन झाले. या वेळी तपोनिधी शांतीब्रह गुरुवर्य श्री महादेव महाराज तात्या चाकरवाडीकर, नारायण महाराज भाऊ उत्तरेशोर प्रप्पिी, यांच्या सह महंतांची उपस्थिती होती.

अखंड हरिनाम सप्ताह काल्याच्या कीर्तनात ह.भ.प. संदीपान महाराज हासेगावकर यांनी महाराष्ट्र ही संतांची भूमी आहे, संत ज्ञानेश्वर महाराज, तुकाराम, मुक्ताई, जनाबाई, ◀◀ पान ३ वर

### तपोनिधी महादेव महाराज तात्या यांनी आभारी मानले

माऊली दादाच्या रौप्यमहोत्सवी सोहळ्यास अखंड हरिनाम सप्ताह व शिवपुराण कथा साठी अनेकांनी खूप कष्ट घेतले आहेत. माऊली दादावर प्रेम करणाऱ्या प्रत्येक माणसाने या माऊली दादाच्या रौप्यमहोत्सवी सोहळ्यास मेहनत कष्ट करून यशस्वी केला या मध्ये माऊली दादांवर असणारी लोकांची श्रद्धा व प्रेम या मुळे हा माऊली दादाचा रौप्यमहोत्सवी सोहळया आनंदात पार पडला.

### महाप्रसादाच्या महापंगती

विसाव्या शतकातील महान सद्गुरू संत ज्ञानेश्वर महाराज माऊली दादाच्या रौप्यमहोत्सवी सोहळ्यात अखंड हरिनाम सप्ताह काल्याचे कीर्तन व शिवपुराण कथा सांगता झाल्यानंतर भाविक भक्तांच्या महाप्रसादाच्या महापगती बसवण्या आल्या सर्वांनी महापगातील महाप्रसाद घेतला

# पेठ बीड पोलिसांची गुटख्यावर कारवाई



बीड । प्रतिनिधी

पेठ बीड पोलीस ठाण्याच्या हद्दीतील भुई गल्ली येथे एका घरात गुटखा असल्याची माहिती पोलिसांना मिळताच सदरील ठिकाणी कारवाई करत गुटखा व मोटार सायकल असा एकूण १ लाख ३९ हजार १७ रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

बीड शहरातील भुई गल्ली येथील मयत वाजेद हसन बागवान यांचे घर भाड्याने घेवून त्यामध्ये गुटखा ठेवण्यात आला होता. याची माहिती पेठ बीड पोलिसांना मिळताच पोलिसांनी घटनास्थळी जावून कारवाई करत १ लाख ९ हजार १७ रूपयांचा गुटखा व मोटार सायकल असा एकूण १ लाख ३९ हजार १७ रूपयांचा मुद्देमाल जप्त केला. या प्रकरणी आरोपी शेख खदीर शेख बशीर, शेख अर्सला शेख खदीर या दोघांजणाविरोधात पेठ बीड ( )पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदरील कारवाई पोलीस अधिक्षक नवनीत काँवत, अप्पर पोलीस अधिक्षक सचिन पांडकर, विभागीय पोलीस अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरिक्षक अशोक मोदीराज, पो.हे.कॉ. रमेश, अल्ताफ, अनिल यांनी केली आहे.



**बीड : राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्तरावर विविध क्रीडा प्रकारामध्ये जिल्ह्यातील खेळाडूंनी उत्कृष्ट कामगिरी केल्याबद्दल मातृभूमी प्रतिष्ठान च्या वतीने उन्हाळी विविध क्रीडा प्रशिक्षण समारोप प्रसंगी जिल्हा क्रीडा अधिकारी अरविंद विद्यागर यांचा पुष्पगुच्छ व सन्मानपत्र देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ. संजय तांदळे ,मातोश्री विद्यालयाचे प्राचार्य बाळासाहेब नागरगोजे, लेक लाडकी अभियानाचे बाजीराव ढाकणे उपस्थित होते.**

# आ.संदीप क्षीरसागरांच्या नेतृत्वाखाली तांबे, मानेंचा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश

बीड । प्रतिनिधी

पुर्वाश्रमीचे शिवसंग्राम पक्षाचे पदाधिकारी असलेले शेषेराव तांबे आणि अक्षय माने यांनी आपल्या शेकडो समर्थकांसह आ.संदीप क्षीरसागरांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षात जाहीर प्रवेश केला.

शनिवारी (दि.१४) रोजी बीड शहरातील राष्ट्रवादी भवन येथे शेषेराव तांबे, अक्षय माने यांचा पक्षप्रवेश सोहळा पार पडला. यावेळी सामाजिक क्षेत्रात लक्षणीय काम करणारे स्व.विनायक मेटेंच्या शिवसंग्राम पक्षामध्ये पुर्वाश्रमीचे असलेले पदाधिकारी शेषेराव तांबे आणि अक्षय माने यांनी आ.संदीप



क्षीरसागर व इतर मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षात जाहीर प्रवेश केला. या पक्षप्रवेश सोहळ्यास माजी आ.सय्यद सलीम, माजी आ.उषाताई दराडे, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे बीड जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के, महिला आघाडी जिल्हाध्यक्ष संजीवनी देशमुख, बीड तालुकाध्यक्ष बाळासाहेब गोरे, बीड शहराध्यक्ष खुर्शीद आलम, हाजी नसीम इनामदार, सम्राट चौहान, मामु गुत्तेदार, शेख शाकेर, रामदास हांगे, माऊली सानप यांच्यासह पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

मेटे साहेबांचे अधूरे स्वप्न पूर्ण करण्याचा प्रयत्न करणार-आ.संदीप क्षीरसागर

स्व.विनायक मेटे साहेब हे शून्यातून ◀◀ पान ३ वर

# प्रदीप मिश्रांची कथा ऐकण्यासाठी आलेल्या दोन महिलांना गमवावा लागला जीव

बीड । प्रतिनिधी

अत्यंत ढिसाळ नियोजन,जागा मिळविण्यासाठीची वशिलेबाजी आणि इतर कारणांनी कायम चर्चेत राहिलेल्या प्रदीप मिश्रांच्या शिवपुराण कथा सप्ताहा दरम्यान दोन महिलांना आपला जीव गमवावा लागल्याचे आता समोर आले आहे.कथेच्या सुरुवातीच्या आणि शेवटच्या दिवशी या दोन घटना घडल्याचे समोर आले.

बीडच्या चाकरवाडीमध्ये प्रदीप मिश्रांच्या शिवपुराणकथेचे आयोजन करण्यात आले होते.त्याची सांगता शनिवारी झाली. प्रदीप मिश्रांची कथा म्हणजे लाखोंची गर्दी हे माहित असतानाही चाकरवाडीमध्ये आयोजकांना त्या तुलनेत नियोजन करता आले नाही.आयोजनात स्थानिकांपेक्षा शेठ च्या मर्जीतल्या लोकांचा भरणा असल्याने नियोजन सातत्याने



कोलमडत होते.त्यातच आता कथेच्या दरम्यान कथा ऐकण्यासाठी आलेल्या दोन महिलांना आपला जीव गमवावा लागल्याचे समोर आले आहे.यामुळे कथेच्या आयोजनाला गालबोट लागल्याचे बोलले जात आहे.कथेच्या पहिल्याच दिवशी कथा ऐकण्यासाठी आलेल्या चंद्रकला पांडुरंग बंडे (वय-६५ रा.मानवत,जि.परभणी) या महिलेचा हृद्यविकाराच्या झटक्याने मृत्यु झाला असल्याचे सांगितले जाते.मात्र ही माहिती बऱ्यापैकी लपविली गेली. तर कथेच्या शेवटच्या दिवशी कथा ऐकून परत निघालेल्या लक्ष्मीबाई बलभीम उकळे (वय-५५,रा.धारूर) या महिलेला भरधाव रुग्णवाहिकेने (.४४..४४४४) ने चाकरवाडी परिसरातच उडविले.यात त्या महिलेचा जागीच मृत्यु झाला आहे. सध्या जिल्हा रुग्णालयात मृतदेहाचे शवविच्छेदन करण्यात येत असून थोड्यावेळात पार्थिव नातेवाईकांच्या ताब्यात देण्यात येणार आहे.दरम्यान कथा सप्ताहादरम्यान झालेले हे भक्तांचे दोन मृत्यु नियोजनावर अनेक प्रश्न निर्माण करणारे ठरले आहेत.

### परळीमध्ये झाले होते सुंदर नियोजन

**प्रदीप मिश्रांच्या कथेचे गारुड समाजावर मोठ्याप्रमाणावर आहे. त्यांची कथा कोठेही असली तरी राज्यातून आणि राज्याबाहेरून देखील लोक येतात. त्यामुळे आयोजकांना हे सारे लक्षात घेऊन नियोजन करावे लागते.तसे नियोजन काही वर्षांपूर्वी बीड जिल्ह्यातील परळीमध्ये झालेल्या शिवकथे दरम्यान करण्यात आले होते. प्रदीप मिश्रांची कथा आणि ज्योतिर्लिंगाचे भूमी असा योग्य असल्याने त्या ठिकाणी देखील लाखोंची गर्दी होती,मात्र तेथील नियोजनामुळे काही अप्रिय घटना घडल्या नव्हत्या.**

# बीडमध्ये बालविवाहाची भयंकर घटना

## एका दिवसांत १३ वर्षांच्या मुलीचं दोन वेळा लग्न, २२ जणाविरुद्ध गुन्हा दाखल

बीड । प्रतिनिधी

बीडच्या शिवाजीनगर भागात बालविवाहाची भयंकर घटना घडली असून एका दिवसांत १३ वर्षांच्या मुलीचं दोन वेळा लग्न लावण्यात आलं असून ही मुलगी पाचवीमध्ये शिकते. सामाजिक संस्थांच्या लक्षात ही बाब येताच त्यांनी हा बालविवाहाचा डाव उधळवून लावला असून या प्रकरणी २२ जनाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मुलीचं लग्न ज्या व्यक्तीसोबत लावून देण्यात आलं ती व्यक्ती ३० ते ३५ वर्षांची आहे. या व्यक्तीच्या बायकोला ही गोष्ट कळताच तिने याप्रकरणी तक्रार दाखल केल्यानंतर ही व्यक्ती पळून गेली. त्यानंतर या मुलीचं लग्न दुसऱ्या मुलाशी लावून देण्यात आलं. या घटनेमुळे बीडमध्ये खळबळ उडाली. याप्रकरणी २२ जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. लग्नानंतर या मुलीचा पहिला नवरा पळून गेला. तर दुसऱ्या नवऱ्याला पोलिसांनी ताब्यात घेतलं आहे. पाचवीपर्यंत शिक्षण



घेतलेल्या या मुलीच्या बालविवाह प्रकरणात शिवाजीनगर पोलिस ठाण्यात काझीसह तब्बल २२ जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला. हा सर्व प्रकार शाहूनगर परिसरात घडल्याने शहरात एकच खळबळ उडाली आहे. फरार झालेल्या पहिल्या नवऱ्याचा पोलिस शोध घेत आहेत. पोलिस या प्रकरणाचा कसून तपास करत आहेत. बीडच्या शिवाजीनगर भागामध्ये राहणाऱ्या आणि पाचवीमध्ये शिकणाऱ्या १३ वर्षांच्या मुलीचे दोन वेळा लग्न झाले. ही मुलगी सोमवारपासून सहावीच्या वर्गात जाण्यासाठी तयारी करत होती. पण त्यापूर्वीच तिच्या वडिलांनी आणि सावत्र आईने तिचे लग्न लावून दिले. या मुलीच्या आईने तिचे लग्न अगोदरच दोन लग्न झालेला आणि दोन मुलांचा बाप असलेल्या एका व्यक्तीशी लावून दिले. शाहूनगरमध्ये गुरूवारी घरातच हे लग्न पार पडलं. लग्नानंतर दोघांचे फोटोही काढण्यात आले होते. या लग्नाबाबत त्या व्यक्तीच्या बायकोला कळाले तेव्हा तिने पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली. पोलिस कारवाई करतील या भीतीने ही व्यक्ती पळून गेली. त्याने आपल्या बहिणीच्या गावामध्ये राहणाऱ्या एका मुलाचे या मुलीसोबत लग्न लावण्यास सांगितले. त्याप्रमाणे एका दिवसांत या मुलीचे दुसरं लग्न लावण्यात आलं आणि त्यांचे फोटोही काढण्यात आले. लग्न झाल्यानंतर हा मुलगा नवरी मुलीला घेऊन जात होता तेव्हा पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत त्याला ताब्यात घेतलं. बालविवाह प्रतिबंधक कायद्याचा भंग झाल्यामुळे संबंधितांवर कठोर कारवाईची मागणी नागरिकांमधून होत आहे. याप्रकरणी २२ जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# राज ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त सोमेश कदम यांच्याकडून रेनकोट




बीड । प्रतिनिधी

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांचा वाढदिवस बीड जिल्हा मनसेचे जिल्हा सचिव सोमेश कदम यांच्याकडून आपत्कालीन सेवा देणारे पत्रकार आणि पोलीस यांचा गौरव करत रेनकोट देवून अनोख्या पध्दतीने साजरा केला आहे.

मनसेचे अध्यक्ष राज ठाकरे यांचा वाढदिवस राज्यभरात मनसैनिक वेगवेगळी शिबिरे राबवून साजरे करत असतात बीड जिल्हा मनसेने मात्र जनतेच्या सेवेसाठी आपत्कालीन सेवा देणारे पत्रकार आणि पोलीस सदैव तत्पर असतात त्यांचा गौरव होणे गरजेचे आहे असा मनोमन निर्णय एकमताने घेवून दि.१४ जून २०२५ रोजी शासकीय विश्रामगृह येथे पत्रकार बांधवांचा आणि बस स्टँण्ड येथील पोलीस चौकीमधील पोलीस कर्मचार्यांना रेनकोट देवून सन्मान केला आहे. यावेळी मनसेचे जिल्हासचिव सोमेश कदम यांच्यासह सिद्धेश्वर धोंडगे, कृष्णा देवकुळ, केशव रत्नपारखे , गणेश भोसले, टिनू राजपूत आदी मनसैनिक मोठ्या प्रमाणावर उपस्थित होते.

# मुंबई पोलीस अधिनियमप्रमाणे जालन्यात वाहतुकीच्या मार्गाचे नियमन-जिल्हाधिकारी

जालना । प्रतिनिधी

शहरातील रस्ता वाहतुकीमुळे सार्वजनिक जीवनास होणारा धोका, अडथळा व लोकांच्या गैरसोयी टाळण्यासाठी नागरिकांची सुरक्षा धोक्यात येत आहे. त्या मुंबई पोलिस अधिनियम १९५१ चे कलम ३३ (१) (ख) अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करुन जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी शहरातील वाहतुकीच्या मार्गाचे नियमन केले आहे.



जालना शहरातील सराफा गल्ली, मामा चौक ते टांगा स्टँड आणि सिंधी बाजार ते अलंकार टॉकीज चौक येथे तीनचाकी आणि चारचाकी वाहनास सकाळी ९ ते रात्री ११ वाजेपर्यंत प्रतिबंध करण्यात आलेला आहे. तसेच शहरात काद्राबाद चौकी, सराफा बाजार, फुलबाजार चौकापर्यंत, महावीर चौक ते सुभाष चौक येथे सकाळी ९ ते रात्री ११ वाजेपर्यंत पी-१ व पी-२ पार्कंग व्यवस्था करण्यात येत आहे.सर्व मार्गावरुन अग्निशामक दल, पोलिस दल, सरकारी वाहन, स्कुल बस तसेच अत्यावश्यक सेवेतील वाहनास प्रवेश राहील. पोलिस अधिकाऱ्यांची परवानगी घेतलेल्या सार्वजनिक धार्मिक कार्यक्रम व सर्व प्रकारच्या मिरवणुकीच्या वाहनाला प्रवेश राहील. वाहनांच्या नियमन संबंधाने ज्या व्यक्तींना आक्षेप, सुचना करावयाच्या असतील त्यांनी १५ दिवसांच्या आत लेखी स्वरुपात जिल्हाधिकारी कार्यालय, जालना यांच्या दाखल करता येतील. मुदतीनंतर प्राप्त होणारे आक्षेप व सुचना विचारात घेतले जाणार नाही. असेही जिल्हादंडाधिकारी डॉ. पांचाळ यांनी कळविले आहे.

# आषाढी वारीच्या निमित्ताने १६ ते १८ जून दरम्यान यशवंतराव चव्हाण नाट्यगृहात भव्य कीर्तन महोत्सव

**बीड । प्रतिनिधी**

स्वर्गीय झुंबरलालजी खटोड प्रतिष्ठान, बीड यांच्या वतीने आषाढी एकादशीनिमित्त १६ जून ते १८ जून या कालावधीत यशवंतराव चव्हाण नाट्यगृह, बीड येथे भव्य कीर्तन महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. या महोत्सवात महाराष्ट्रातील ख्यातनाम सात सांप्रदायिक कीर्तनकार आपली कीर्तन सेवा देणार आहेत.

या महोत्सवाचे खास वैशिष्ट्य म्हणजे, आषाढी वारीचा अनुभव प्रत्यक्ष वारीप्रमाणेच भाविकांना मिळणार आहे. आळंदी ते पंढरपूर या वारीदरम्यान संतांच्या पालख्या ज्या ठिकाणी मुक्कामी थांबतात, त्या ठिकाणचे वर्णन कीर्तनांमधून करण्यात येणार आहे. त्यामुळे जणू आपण प्रत्यक्ष वारीमध्ये सहभागी झालो आहोत, असा अध्यात्मिक अनुभव प्रेक्षकांना लाभणार आहे. हे कीर्तन महोत्सव संत ज्ञानेश्वर महाराज यांच्या साडेसातशेवी



जन्मजयंतीच्या पार्श्वभूमीवर आयोजित करण्यात आले असून, गेली २५ वर्षे खटोड प्रतिष्ठान कीर्तन आणि संत विचारांचे बीज समाजात पेरण्याचे कार्य सातत्याने करत आहे. १६ ते १८ जून, रोज सकाळी १० ते सायंकाळी १० पर्यंत चालणाऱ्या या कीर्तन महोत्सवासाठी प्रवेश सर्वांसाठी विनामूल्य आहे. खटोड प्रतिष्ठानच्या वतीने बीड शहरातील सर्व कीर्तनप्रेमी, भाविक भक्त, नागरिकांना नम्र विनंती करण्यात येत आहे की, आपल्या कुटुंबासह व मित्रमंडळींसह या भव्य कीर्तन महोत्सवात अवश्य सहभागी व्हावे आणि अध्यात्मिक लाभ घ्यावा.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

cmyk

# माझ्याकडे बघून मतदान करा, कारखान्याचा चेअरमन मीच होणार अजितदादांचं आवाहन, भाव नाही दिला तर नाव सांगणार नाही

**बारामती । प्रतिनिधी**



जोपर्यंत माझे हात पाय हालतात तोपर्यंत सगळ्यांचे भले करणार असल्याचे वक्तव्य राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केले. जेव्हा मला वाटेल मला कोण उजवे आहे. मी आपोआप बाजूला जाईल असे अजित पवार म्हणाले. अजित पवार यांच्या उपस्थितीत बारामती तालुक्यातील माळेगाव सहकारी साखर कारखान्याच्या प्रचाराचा शुभारंभ झाला. त्यावेळी अजित पवार बोलत होते. कारखान्याचा चेअरमन मीच होणार आहे. माझ्याकडे बघून मतदान करा असे आवाहन अजित पवार यांनी केले. जर पाच वर्षे भाव नाही दिला तर नावाचा अजित पवार नाही असेही ते म्हणाले.

आपलं पॅनेल टू पॅनल मतदान करा. माझ्याकडे बघून मतदान करा असेही अजित पवार म्हणाले. छत्रपती कारखाना हितासाठी आम्ही मागचे सोडून दिले. मी राजकारण करायचं तिथं करेल जिथं प्रपंचाचा विषय आहे तिथं राजकारण करणार नाही असेही अजित पवार म्हणाले. कारखान्याला गाडी मिळणार नाही. चहा मिळेल, कारखाना सुरु असेल तर रस मिळेल, हॉटेलचे बिल मिळणार नाही असेही अजित पवार म्हणाले. आम्ही २० जणांचे राजीनामा घेतले आहेत. कुणी वेडेवाकडे काम केलं तर त्याचा राजीनामा मंजूर करणार आहे. आजच माळेगावचा चेअरमन जाहीर करणार. माळेगावचे भले करायचं असेल तर अजित पवारच करु शकतो असेही ते म्हणाले. छत्रपती साखर कारखा्याला पैशांची गरज होती. मी एकाला सांगितले २५ कोटी पाहिजेत. त्याने चेअरमनला सांगितले कागदपत्रे द्या. त्याला परत फोन केला आणि त्याला सांगितले अजित पवारांची पत नाही का? त्याने संध्याकाळी पैसे पाठवल्याचे अजित पवार म्हणाले. दोन जण उठवायला लागतात तरी यांना डायरेक्टर व्हायचंय. अरे थांबणार कधी? असा सवालही अजित पवारांनी केला. मी कामाचाच माणूस आहे. मी फॉर्म भरला तर तुमच्या का पोटात दुखतं? असा सवाल अजित पवारांना विरोधकांना केला. आम्ही कारखाना उभा केला तर यांना का त्रास होतोय. माझा खासगी कारखाना काढायची अजिबात तयारी नव्हती. सरकारने बंधने घातल्याचे अजित पवार म्हणाले.

**मी एखाद्याला निवडून नाही द्यायचं म्हणालो तर काय करतो हे महाराष्ट्राला माहिती**

आम्ही आमचे कारखाने कुणाला चालवयाला दिले नाहीत. पंपावर काम करून धीरूभाई अंबानी मोठे झालेत. मी जर सहकार मोडायला निघालो असतो तर मी संस्था मोठ्या केल्या असत्या का? असा सवालही अजित पवार यांनी केला. मी एखाद्याला निवडून नाही द्यायचं म्हणालो तर काय करतो हे सगळ्या महाराष्ट्रला माहिती आहे. पुरंदर ने आणि शिरुरने पण बघितले आहे असे अजित पवार म्हणाले.

# अपघातात दुखापत झाली नसतानाही द्यावी लागणार नुकसान भरपाई, विमा कंपनीला ग्राहक आयोगाचा

**पुणे । प्रतिनिधी**

अपघाताच्या घटनेत केवळ शक्यतेच्या-शंकेच्या आधारे विम्याची रक्कम नाकारण्याची विमा कंपनीची भूमिका अयोग्य आणि बेकायदा आहे. विम्याची पॉलिसी सुरू असतानाही अपघाताची नुकसान भरपाई नामंजूर करण्यासाठी विमा कंपनीकडे योग्य आणि कायदेशीर कारण असायला हवे. या कारणांना ठोस आणि सबळ पुराव्यांचा आधार आवश्यक आहे. ते सिद्ध करण्याची जबाबदारीही विमा कंपनीची असून, या प्रकरणात ती पार पाडण्यात विमा कंपनी अयशस्वी ठरल्याचा निष्कर्ष नोंदवित ग्राहक आयोगाने विमा कंपनीला दणका देत ग्राहकाला नुकसान भरपाईचे आदेश दिले.

अतिरिक्त जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोगाचे अध्यक्ष डॉ. अरुण गायकवाड आणि सदस्या प्रणाली सावंत व कांचन गंगाधरे यांनी हा महत्त्वपूर्ण निकाल दिला. कंपनीने विमाधारकाला दहा लाख ४६ हजार रुपये दावा नाकारल्याच्या तारखेपासून वार्षिक नऊ टक्के




व्याजाने द्यावे. तसेच, तक्रारदाराला झालेल्या शारीरिक व मानसिक त्रासाची भरपाई व तक्रार खर्चापोटी ४५ हजार रुपये द्यावे, असे आदेशही आयोगाने विमा कंपनीला दिले आहेत.

या प्रकरणी राजेंद्र बोथरा (रा. शिरूर) यांनी नामांकित विमा कंपनी आणि वाहन तारण म्हणून ठेवलेल्या राष्ट्रीयीकृत बँकेविरोधात ग्राहक आयोगाकडे दाद मागितली होती. तक्रारदारांच्या वतीने ॲड. अनिल सातपुते यांनी बाजू मांडली.

तक्रारदार ८ जून २०२१ रोजी आपल्या कुटुंबियांसह प्रवास करत होते. कामरगाव गावाच्या हद्दीतील पुणे महामार्गावरून जात असताना त्यांच्या गाडीचा उजव्या बाजूचा टायर अचानक फुटून अपघात झाला. यात, पुढील सीटवर बसलेल्या तक्रारदार आणि मुलास एअरबॅग्जमुळे काही झाले नाही. मात्र, मागे बसलेल्या पत्नी, मुलगी आणि अन्य नातेवाईक जखमी झाले. अपघातानंतर गाडी पलटी झाल्याने गावकर्यांच्या मदतीने ते बाहेर आले. यावेळी, त्यांना शिरूर येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले.यानंतर त्यांनी विमा कंपनीला संपर्क करत गाडीच्या नुकसानीबाबत कळविले. कंपनीच्या सर्व्हेअरने वाहनांची तपासणी करून अधिकृत सर्व्हिस सेंटरकडे दुरूस्तीसाठी पाठविण्यास सांगितले. यावेळी वाहन दुरूस्त होणे शक्य नसल्याचे कळाल्यानंतर त्यांनी विम्याच्या रकमेसाठी अर्ज केला. चौकशीदरम्यान, त्यांना विमा मंजूर होईल असे सांगण्यात आले. मात्र, दोन महिन्यानंतर तक्रारदारांना संपर्क करत चालकाचा तपशीलाबाबत दिशाभूल करणारी माहिती दिल्याचे सांगून विम्याचा अर्ज नाकारला. त्यामुळे तक्रारदारांनी ॲड. सातपुते यांमार्फत विमा कंपनीविरोधात ग्राहक आयोगाकडे दाद मागितली होती.

# पोलिस निरीक्षक राजेंद्र लांडगे यांच्याविरुद्ध आणखी एक गुन्हा

**पुणे । प्रतिनिधी**

बोगस जमीनमालक दाखवून कोट्यवधी रूपये किमतीची जमीन लाटल्याप्रकरणी चंदननगर पोलिस ठाण्यात यापूर्वीच गुन्हा दाखल असलेल्या पोलिस निरीक्षक राजेंद्र लांडगे याच प्रकारचा आणखी एक कारनामा उघड झाला आहे.

चंदननगरप्रमाणेच वाघोली येथेही बोगस जमीनमालक दाखवून कोट्यवधी रुपये किमतीची तब्बल दहा एकर जमीन बळकावण्याचा प्रकार लांडगे व काहींनी केला. याप्रकरणी वाघोली पोलिस ठाण्यात लांडगे यांच्यासह १६ जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिस निरीक्षक राजेंद्र लांडगे, नोयल जोसेफ दास, नोअल जोसेफ दास, ज्योती नोयल दास, राहुल नोयल दास, रोशनी नोयल दास, जॉक्सन नोयल दास, रोहित जॉक्सन दास, गिरीश रामचंद्र कामठे, हेमंत कामठे, संतोष शेट्टी, आदित्य घावरे, अमोल भूमकर, रामेश्वर बळीराम मस्के, सह दुय्यम निबंधक कार्यालयील एक व्यक्ती, याच कार्यालयातील दस्त नोंदणी करणारे निबंधक अशा १६ जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

हा प्रकार २०२४ ते २३ जानेवारी २०२५ या कालावधीत घडला आहे. याप्रकरणी अपर्णा यशपाल वर्मा (वय ५८, रा.अंधेरी मुंबई) यांनी वाघोली पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. लांडगे यांच्यासह अन्य आरोपींविरुद्ध चंदननगर पोलिस ठाण्यात यापूर्वीही फसवणुकीचा गुन्हा दाखल आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी अपर्णा वर्मा या पुण्यात वास्तव्यास असताना त्यांनी वाघोली येथे १० एकर जमीन खरेदी केली होती. त्यानंतर त्या दुबईला गेल्या होत्या. सध्या त्या मुंबईत वास्तव्याला आहेत. दरम्यान, वर्मा या दुबईला असतानाच्या कालावधीत नगर, इस्लामपूर व राजस्थान येथील अपर्णा वर्मा नावाच्या तीन महिला पुढे आल्या. त्यांनी फिर्यादी वर्मा यांच्या जमिनीच्या आपणच खऱ्या मालक असल्याचा दावा केला होता. संबंधित महिलांनी या प्रकरणात न्यायालयात दावाही दाखल केला होता. त्यानंतर फिर्यादी वर्मा यांना गुन्हा दाखल करण्याची भिती दाखवून राजेंद्र लांडगे व त्याच्या साथीदारांनी साडे सहा कोटी रुपये त्यांच्याकडून खंडणी वसूल केली होती.

त्यावेळी दरम्यान, नोयल जोसेफ दास आणि साथीदारांनी ही जमीन १९९९ मध्ये खरेदी केली असून तिच्यावर आपली मालकी आहे. आपण परदेशात असल्यामुळे सात बारा उताऱ्यावर नाव लावू शकलो नव्हतो. आता पुण्यात परतलो आहोत, असा दावा करून फिर्यादीच्या जागेचे बनावट खरेदीखत करून ते खरे असल्याचे भासविले होते. संबंधित जमीनचे साठेखत सह दुय्यम निबंधक यांच्या कार्यालयात नोंदणीकृत करून फिर्यादी वर्मा यांची जमीन बळकाविण्याच्या उद्देशाने त्यांची फसवणूक करण्यात आली होती. दरम्यान, एकाच जमिनीवर अपर्णा वर्मा नावाच्या चार महिलांनी दावा केला होता.

# खासगी क्लासेसशी टाय-अप असलेल्या महाविद्यालयांवर कठोर कारवाई करा

**पुणे । प्रतिनिधी**

राज्यातील बहुसंख्य कनिष्ठ महाविद्यालय व खासगी क्लासेस यांचे टाय-अप असून संगणमतानी विद्यार्थी, पालक यांची आर्थिक पिळवणुक केली जात आहे. याचे गांभीर्य लक्षात घेऊन संबंधित महाविद्यालयांवर कठोर कारवाई करावी यासाठी शहरातील विविध संघटनी शिक्षण आयुक्त, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालकांकडे आग्रह धरला आहे.

इंटिग्रेटेड महाविद्यालयांकडून विद्यार्थी आणि पालकांना जेईई, सीईटी, नीट, आय. आय. टी. या परीक्षांना उत्तम गुण मिळवून देण्याची हमी देऊन संगणमत केलेल्या खासगी क्लासेस मध्ये प्रवेश घेण्यास भाग पाडले जाते. इंटिग्रेटेड महाविद्यालयात विद्यार्थ्यांना हजेरीमध्ये मोठी सवलत



देऊन दर्जेदार शिक्षणापासून वंचित ठेवत आहेत. या विषयाच्या अनुषंगाने मागील अनेक वर्षापासून विद्यार्थी संघटना सक्षम यंत्रणेकडे तक्रार करून कारवाईची मागणी करत आहेत. परंतु राज्य शासन आणि प्रशासनाच्या उदासीनतेमुळे त्यांचे चांगलेच फावले आहे.

इंटिग्रेटेड महाविद्यालयांकडे प्रवेश घेण्याचा विद्यार्थ्यांचा कल असल्याने अनेक अनुदानित महाविद्यालया मधील विद्यार्थी कमी झाले असून महाविद्यालये बंद पडण्याच्या मार्गावर आहेत. त्यामुळे अनुदानित महाविद्यालयांचे अनुदान इतरत्र वळविण्यासाठी राज्य शासन तर त्यांना पाठीशी घालत नाही ना ? अशी शंका उपस्थित केली जात आहे. याबाबत राज्य शासन आणि इतर संबंधित अधिकाऱ्यांनी यामध्ये तात्काळ लक्ष घालून नफेखोरी करणारी इंटिग्रेटेड महाविद्यालयांवर ताबडतोब कारवाई करावी, अशी मागणी पुणे शहर विद्यार्थी विकास मंचचे अध्यक्ष ड. सुरेश खुर्पे, पुणे जिल्हाध्यक्ष अनिल शेवरे, पुणे शहर काँग्रेसचे सचिव राहुल तायडे, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस लीगल सेलचे सचिव ड. फैयाज शेख, वंचित बहुजन आघाडीचे अतुल झोडगे, पुणे शहर काँग्रेसचे प्रेम राजगुरू, राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेसचे अमरजीत पबमे आदींनी केली आहे.शिष्टमंडळाने शिक्षण आयुक्त सचिंद्र प्रताप सिंह व माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालक डॉ. श्रीराम पानझाडे यांना निवेदनही दिले आहे. मागण्या मान्य न झाल्यास विद्यार्थी, पालकांना बरोबर घेऊन आंदोलन करण्याचा इशाराही देण्यात आलेला आहे.

# संत तुकोबारायांच्या मानाच्या आश्वाचे गोतोंडी गावात स्वागत

**इंदापूर । प्रतिनिधी**

संत श्रेष्ठ तुकाराम महाराज पालखी सोहळ्यासाठी श्री क्षेत्र पंढरपूर वरून क्षेत्र देहू कडे मार्गस्थ झालेल्या पालखी सोहळ्यातील मानाच्या अश्वाचे गोतोंडी येथील माऊली पाटील यांच्या कुटुंबीयांनी हरिनामाच्या गजरात उस्फुर्त स्वागत केले.



संत तुकाराम महाराज पालखी सोहळ्यातील मुख्य आश्वाचे स्वागताची परंपरा गोतोंडी गावचे माऊली पाटील यांनी तब्बल १०० वर्षापासून त्यांच्या पिढ्यांनी जपलेली आहे. अश्व पाटील यांच्या घरी विसाव्यासाठी थांबतो.त्यामुळे परिसरातील वारकरी भक्तगण मोठ्या संख्येने दरवर्षी उपस्थित असतात. संत तुकाराम महाराज पालखी सोहळ्यातील गोल रिंगणामध्ये धावणारा हा अश्व आहे. या आश्वाससोबत पालखी सोहळ्याचे प्रमुख चोपदार ह.भ.प काका महाराज गिराम, वारकरी विणेकरी पताकाधारी तुळशीधारी महिला वारकऱ्यांचे स्वागत हरी नामाचा गजर करत करण्यात आले. याप्रसंगी ऋषिकेश पाटील, संजय पाटील, स्वप्निगोतोंडी , तुकाराम बिबे, दादा मोरे, कारंडे महाराज, युग येळे तांबिले भाऊसाहेब, मारकड भाऊसाहेब, महिला भगिनी मोठ्या प्रमाणामध्ये उपस्थित होते. यावेळी माऊली पाटील यांचे वतीने महाप्रसाद कार्यक्रम पार पडला

# पेन्शनमधून पोटगीचा आदेश; ६३ वर्षीय महिलेला दिलासा

**पुणे । प्रतिनिधी**

'पत्नीला सांभाळणे ही पतीची नैतिक जबाबदारी आहे' असा निष्कर्ष काढत ६५ वर्षीय पतीला ६३ वर्षीय पत्नीला दरमहा १० हजार रुपये अंतरिम पोटगी देण्यास सांगितले आहे. कॅन्टोन्मेंट येथील प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी पी.के.राठोड यांनी हा आदेश दिला आहे. निवृत्त शासकीय अधिकाऱ्याला ४० हजार रुपये सेवानिवृत्ती वेतन आहे. यातून ही रक्कम द्यावी लागणार आहे.

माधव आणि माधवी अशी दोघांची नावे आहेत. १९९० मध्ये दोघांचा विवाह झाला आहे. दोघांना दोन मुली आणि एक मुलगा आहे. मुलगाही शासकीय सेवेत असून, तो बाहेरगावी असतो. तर मुली गृहिणी आहेत. दोघे वेगळे



राहत असून, माधवी मुलीकडे राहते.


माधवीने कौटुंबिक हिंसाचार कायद्यानुसार ड. प्रणयकुमार लंजिले, ड. अनिकेत डांगे, ड. हर्षदा शुक्रे आणि ड. अक्षता शिळीमकर यांच्यामार्फत २०२३ मध्ये दावा दाखल केला होता. त्यामध्ये अंतरिम पोटगीची मागणी केली होती. रेकॉर्ड वरून पतीला ४० हजार रुपये सेवानिवृत्ती वेतन असल्याचे दिसून येत आहे. यावरून पत्नीला पतीने सांभाळणे कायदेशीर जबाबदारी असल्याचा निष्कर्ष काढत न्यायालयाने वरील आदेश दिला.

# पारोडीत वीज पडून दुमजली बंगल्याचे नुकसान; घरातील सर्व विद्युत उपकरणे जळून खाक

**शिरूर । प्रतिनिधी**

शिरुर तालुक्यातील पारोडी गावात मंगळवार (दि १२) जुन रोजी रात्री ८:४५ च्या दरम्यान किरण टेमगिरे यांच्या दुमजली बंगल्यावर वीज कोसळून घराचे मोठे नुकसान झाले आहे. विजेचा जोरदार धक्का बसल्याने बंगल्यावरील टोपीचा काही भाग जमिनीत कोसळला. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही. मात्र, सुमारे २ लाख ५० हजार रुपयांचे आर्थिक नुकसान झाले आहे.

मंगळवारी रात्री ८:४५ च्या सुमारास पारोडी परिसरात वादळी वाऱ्यासह जोरदार पाऊस चालु होता. यावेळी अचानक मोठा विजांचा कडकडाट झाल्याचा आवाज परिसरात ऐकू आला. या घटनेनंतर तातडीने किरण टेमगिरे यांनी घरी धाव घेतली असता घरातील संपुर्ण वायरिंग जळून गेल्याचे व घरातील वीज मीटर उद्धस्त झाल्याचे आढळले. टीव्ही, फ्रीज, पंखे, लाईट फिटिंग्ज आदी सर्व विद्युत साहित्य पूर्णपणे निकामी झाले आहे.



बुधवार (दि १३) रोजी पारोडी गावचे पोलीस पाटील कुंडलिक येळे आणि तलाठी कोमल माने यांनी घटनास्थळी भेट देऊन पंचनामा केला. वीज वितरण कंपनीकडूनही प्राथमिक तपास सुरु आहे. महसूल व विज वितरणच्या अधिकाऱ्यांनी संपुर्ण नुकसानीचा अहवाल तयार केल्यानंतर मदत मंजुर करण्याची प्रक्रिया राबवली जाणार आहे.सध्या हवामान विभागाने विजांसह पावसाचा इशारा दिलेला असून ग्रामस्थांना सुरक्षित स्थळी थांबण्याचे व अनावश्यकपणे इलेक्ट्रिक उपकरणे सुरु ठेवू नये, असे आवाहन प्रशासनाने केले आहे.

# अल्पवयीन मुलासोबत अनैसर्गिक कृत्य करणाऱ्या तरुणास दहा वर्षे सक्तमजुरी

**पुणे । प्रतिनिधी**

अल्पवयीन मुलासोबत अनैसर्गिक कृत्य व लैंगिक चाळे करणार्याला विजय महादेव गावडे (वय ३१, रा. फिरस्ता, मूळ. बेटवडे, ता. दौंड) यास न्यायालयाने दहा वर्षे सक्तमजुरी आणि वीस हजार रुपये दंडाची शिक्षा सुनावली. विशेष न्यायाधीश डी. पी. रागीट यांनी हा निकाल दिला. दंडाची रक्कम पीडित मुलाला देण्यात यावी, असेही न्यायालयाने आदेशात म्हटले आहे. याबाबत पीडित १७ वर्षीय मुलाने बंडगार्डन पोलिसात फिर्याद दिली होती.



ही घटना २५ मार्च २०१७ रोजी घडली होती. या घटनेनंतर शहरात खळबळ उडाली होती. पीडित पुणे रेल्वे स्टेशन येथे अंडा भुर्जीच्या गाडीवर पाणी भरायचे काम करायचा. तर गावडे हाही या परिसरात अंडा भुर्जीची गाडी चालवत होता. 'अंघोळ करायला जाऊ' म्हणून तो पीडित मुलाला एस.टी.स्टॅण्डच्या सुलभ शौचालयात घेऊन गेला. तिथे त्याच्यावर तीनवेळा अनैसर्गिक अत्याचार केल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. या प्रकरणात सरकारी पक्षातर्फे अतिरिक्त सरकारी वकील सुनील मोरे यांनी सात साक्षीदार तपासले. यामध्ये पीडित मुलगा व वैद्यकीय अधिकार्यांची साक्ष महत्त्वाची ठरली. तत्कालीन पोलीस उपनिरीक्षक सतिश पवार यांनी या प्रकरणाचा तपास केला. तर न्यायालयीन कामकाजासाठी सहायक पोलीस फौजदार गोपिका ओव्हाळ यांनी मदत केली.

# चतुर्थी दिनी घेतले लाखो भाविकांनी 'श्री विघ्नहरा'चे दर्शन !

**ओझर । प्रतिनिधी**

अष्टविनायकांतील मुख्य स्थान असलेल्या श्री क्षेत्र ओझर येथे संकष्टी चतुर्थी निमित्त लाखो भाविकांनी विघ्नहराच्या दर्शनाचा लाभ घेतला. पहाटे ५ वाजता श्री विघ्नहर गणपती देवस्थान ट्रस्ट चे विश्वस्त विनायक मांडे, संतोष कवडे, शिल्पा जगदाळे यांच्या शुभहस्ते श्रींना महाअभिषेक पूजा करून दर्शानासाठी मंदिर खुले करण्यात आले.

मंदिरामध्ये चतुर्थी निमित्त महाआरती करण्यात आली. महाआरतीचा मान नितीन खाटेकर, अक्षय गवळी, पप्पा खोत, संजय काकडे, अमित चिखले यांना मिळाला. पहाटे पाच ते रात्री आकरापर्यंत रांगेत सुमारे एक लाख भाविकांनी दर्शनाचा लाभ घेतला. सकाळी ७.०० वा. व दुपारी १२.०० वा. मध्यान्ह आरती करण्यात आली. सकाळी ८.०० वा. नियमित पोथी वाचन करण्यात आले.

सकाळी १०.३० वा.''श्री स




नैवद्य दाखवून भाविकांना खिचडी वाटप श्री विघ्नहर गणपती देवस्थान ट्रस्ट च्या वतीने करण्यात आली. आज संकष्टी चतुर्थी निमित्ताने विघ्नहर मंदिरात फुलांची आरस विघ्नहराला रेशमी जरीचा पोशाख करण्यात आला होता. तसेच सोन्याचे अलंकार श्री विघ्नहराला परिधान करण्यात आले. व येणाऱ्या भाविकांसाठी मंदिरात दर्शनरांग,पाणी पिण्याचे व्यवस्था, अभिषेक व्यवस्था. देणगी कक्ष ,अभिषेक करण्यासाठी शमी वृक्षाखाली व्यवस्था,दर्शन झाल्यानंतर विसाव्यासाठी विघ्नहर उद्यान ,चप्पल स्टॅन्ड,पार्किंग, कमीत कमी वेळेतील दर्शनासाठी मुखदर्शन व्यवस्था इत्यादी व्यवस्था करण्यात आली. सायंकाळी ७.०० वा. नियमित हरिपाठ करण्यात आले. व चंद्रोदयापर्यंत कीर्तनकार ह.भ.प.तन्वीताई विश्वासराव, कळंब यांचे हरिकीर्तन झाले. त्यांना साथसंगत राम प्रसादिक भजनी मंडळ शिरोली यांनी दिली. आजचे अन्नदाते ज्ञानेश्वर गजानन रवळे व बंधू ओझर यांनी चतुर्थीचे वारकरी अन्नदान केले रात्री १०.३० वाजता शेजआरती करून ११.०० वाजता मंदिर बंद करण्यात आले. आजच्या महाआरतीच्या मानकरी यांनी विकास कामात सहभागी होवून ट्रस्ट ला देणगी दिली. दानशूर व्यक्तीमत्व बाळासाहेब सांडभोर, राजगुरुनगर ,अवधुत अश्विन भागवत, उमाजी नाना ढमाले (ढमालेमळा ,ओतूर) कै. रमेश बाबुराव पेठेकर स्मर. श्रीराम पेठेकर ,निलंगा नितीन भाऊसाहेब खाटेकर ,पारगाव यांनी देवस्थान ट्रस्ट ला देणगी दिली. आलेल्या भाविकांचे स्वागत देवस्थान ट्रस्ट चे अध्यक्ष बाळासाहेब कवडे ,उपाध्यक्ष तुषार कवडे, सचिव सुनील घेगडे, खजिनदार दत्तात्रय कवडे, विश्वस्त, प्रकाश मांडे , सुर्यकांत रवळे, गोविंद कवडे ,विक्रम कवडे, समिर मांडे , विनायक मांडे , संतोष कवडे , विलास कवडे , विनायक जाधव, मंगेश पोखरकर, शिल्पा जगदाळे यांनी केले. गर्दीचे नियोजन देवस्थान ट्रस्ट चे व्यवस्थापक व कर्मचारी यांनी केले.

# जिल्ह्यासाठी ११५ आधार नोंदणी संच मंजूर; ३५६ अर्ज झाले होते प्राप्त

पुणे । प्रतिनिधी

नवीन आधार नोंदणी संच वितरणासाठी जिल्हाधिकारी कार्यालयाकडून आधार नोंदणी केंद्राकरिता अर्ज मागवण्यात आले होते. यासाठी ३५६ अर्ज प्राप्त झाले होते.




यातील २७२ अर्ज पात्र ठरले आहेत.

जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली सर्व पात्र अर्जदारांसमक्ष आधार संच वितरण सोडत १२ जून रोजी घेण्यात आली. यामध्ये ११५ पात्र अर्जदारांना नवीन आधार नोंदणी संचांची मंजूरी अटी व शर्तीच्या अधीन राहून देण्यात आली. आधार नोंदणी केंद्राकरिता ग्रामीण कार्यक्षेत्राकरिता ६५ रिक्त केंद्र जाहीर केली होती. त्यामध्ये ६२ अर्जदारांना सोडतीद्वारे आधार केंद्र मंजूर करण्यात आली आहेत. नगर परिषद कार्यक्षेत्रामध्ये एकूण ७ रिक्त केंद्र जाहीर केली होती. त्यामध्ये ७ अर्जदारांना सोडतीद्वारे आधार केंद्र मंजूर करण्यात आली.

पुणे महापालिका कार्यक्षेत्रामध्ये कार्यक्षेत्रामध्ये एकूण २२ रिक्त केंद्र जाहीर केली होती, त्यामध्ये २२ अर्जदारांना सोडतीद्वारे आधार केंद्र मंजूर करण्यात आले. तर पिंपरी-चिंचवड महापालिका कार्यक्षेत्रामध्ये एकूण २८ रिक्त केंद्र जाहीर केली होती. त्यामध्ये २४ अर्जदारांना सोडतीद्वारे आधार केंद्र मंजूर करण्यात आली आहेत. या नवीन आधार संच वितरण सोडतीवेळी अपर जिल्हाधिकारी सुहास मापारी, उपजिल्हाधिकारी तथा आधार नोडल अधिकारी पल्लवी घाटगे व आधार संच वितरण समिती सदस्य उपस्थित होते.